# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

निष्काम जन सेवाय समर्पिता

## दिनांक २०-०८-२००८ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

बुधवार दिनांक २० ऑगस्ट २००८ रोजी (का.प.क्र.१४) मा.महापौर सौ.विजया किशोर रहाटकर यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी ३.५५ वा.वंदेमातरम या गिता-ने सुरू झाली सभेला मा.आयुक्त श्री.दिलीप बंड नगर सचिव श्री.एम.ए.पठाण तसेच संबंधीत अधिकारी व खालील प्रमाणे पालिका सदस्य उपस्थित होते.

०१. स.स.श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
०२. स.स.श्री.संतोष सुधाकर जेजुरकर
०३. स.स.श्री.अशरफ मोतीवाला
०४. स.स.श्री.बमणे पुनमचंद सोनाजी
०५. स.स.श्री.सुरे सीताराम इसराम
०६. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब पुंडलिक
०७. स.स.श्री.नाहदी नासेर महमंद याहीया
०८. स.स.श्री.पांडे विनायक प्रभाकर
०९. स.स.श्री.दाभाडे मिलींद यशवंत
१०. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
११. स.स.श्री.खान सलिम खान यासीन
१२. स.स.श्री.जगताप संजय उत्तमराव
१३. स.स.श्रीमती मसरद बेगम शरफोद्दीन
१४. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१५. स.स.सौ.जोशी रजनी रमेश
१६. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
१७. स.स.श्री.अत्तरदे प्रकाश सुका
१८. स.स.श्री.जैस्वाल अनिल जुगललाल
१९. स.स.श्री.सोनवणे कचरू श्रीपती
२०. स.स.सौ.इंगळे शंकुतला सांडुजी
२१. स.स.श्रीमती मिराबाई रामराव शिंदे
२२. स.स.सौ.पाटील दिपाली सुनिल
२३. स.स.सौ.बेंद्रे विमल तुकाराम
२४. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
२५. स.स.श्रीमती खान अजरा जबीन मसुद खान
२६. स.स.श्रीमती खान मेहरून्नीसा खान हमीद
२७. स.स.श्री.मो.जावेद मो.इसाक
२८. स.स.सौ.मिटकर शोभा हरीश्चंद्र
२९. स.स.श्रीमती यास्मीन बेगम अब्दुल कदीर
३०. स.स.श्री.खान जावेद हसन कासिम हसन
३१. स.स.श्री.स.खुसरो बुऱ्हानोद्दीन
३२. स.स.श्री.अ.रशिद खान (मामु) हमीद खान

३३. स.स.सौ.लता श्रीनिवास दलाल
३४. स.स.श्री.रिडलॉन संजु सुग्रीव
३५. स.स.श्री.खान कैसर बद्रोद्दीन
३६. स.स.श्रीमती कुरैशी नजमा बेगम युनुस
३७. स.स.श्री.खान निसार मोहमंद खान
३८. स.स.श्री.शेख इब्राहीम पटेल शेख इमाम
३९. स.स.श्री.हाजी शेर खान अ.रहेमान
४०. स.स.सौ.राऊत छाया विलास
४१. स.स.श्री.दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर
४२. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४३. स.स.श्री.अमोदी अबुबकर बिन सईद
४४. स.स.श्री.तुपे त्र्यंबक गणपतराव
४५. स.स.सौ.पोळ सरला सखाराम
४६. स.स.श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
४७. स.स.श्रीमती खान जहुरबी नासेर
४८. स.स.सौ.बोरामणीकर कला सुरेश
४९. स.स.श्री.डॉ.कराड भागवत किसनराव
५०. स.स.सौ.मंगला प्रकाश गायकवाड
५१. स.स.श्री.रेणुकादास दत्तोपंत वैद्य
५२. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
५३. स.स.सौ.रेखा कैलास काथार
५४. स.स.सौ.पाटणी हर्षमाला विजयकुमार
५५. स.स.डॉ.बिनवडे आशा उत्तमराव
५६. स.स.श्री.खुडे विजय किसनराव
५७. स.स.श्री.संतोष खेंडके पाटील
५८. स.स.श्रीमती जयश्री सारंग किवळेकर
५९. स.स.श्री.गांगवे बन्सीलाल तुळशीराम
६०. स.स.सौ.ससाणे सरिता अशोक
६१. स.स.श्री.भगवान (बापु) देविदासराव घडमोडे
६२. स.स.श्री.रवि साहेबराव कावडे
६३. स.स.श्री.डांगे बाबासाहेब लक्ष्मण
६४. स.स.श्री.कुचे नारायण तिलोकचंद
६५. स.स.सौ.शिंदे पुष्पा बाळु
६६. स.स.सौ.वाघमारे पार्वताबाई विजय
६७. स.स.श्री.विसपुते शंशाक दामोधर
६८. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६९. स.स.सौ.कोंडेकर अंजली दिलीप
७०. स.स.श्री.जोशी संजय रामदास
७१. स.स.श्री.दाभाडे हिम्मतराव साळुबा
७२. स.स.श्री.ओबेरॉय मनमोहनसिंग करमसिंग
७३. स.स.श्री.संजय पांडुरंग शिरसाट
७४. स.स.सौ.जैन अल्पा विकास
७५. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन

७६. स.स.श्रीमती मोमीन सोफिया फिरदोस अय्युबखान
७७. स.स.सौ.अनिता नंदकुमार घोडेले

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्य</u>**

०१. स.स.श्री.संजय किसनराव केनेकर
०२. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
०३. स.स.श्री.राजेश (पप्पु) गुलाबचंद व्यास
०४. स.स.श्री.सुरजितसिंग सबरवाल
०५. स.स.श्री.सुरेंद्र माणिकराव कुलकर्णी

<u>संवाद :</u>

मा.महापौर : चर्चेसाठी वेळ देण्यात येतो चर्चा करावी.

श्री.सतीश कटकटे :प्रभाग कार्यालय ड मधील खाजगी एजन्सीला स्वच्छतेचे दिलेले काम रद्द केले महापालिकेचे मजूर कर्मचारी स्वच्छतेचे कामासाठी दिले ते हजर झाले नाही. स्वच्छतेसाठी आवश्यक ते साहित्य नाही. कचरा वाहून नेण्यासाठी छोटया गाडया नाही त्यामूळे स्वच्छता होत नाही. या बाबतीत केव्हा कार्यवाही करणार आहे.

सौ.रजनीताई जोशी :विकास कामे होत नाही वर्क ऑर्डर दिलेली व वार्डातील इतर सर्व तसेच स्पीलओव्हरची कामे सुध्दा बंद आहे मा.आयुक्तांनी सांगितले की वार्ड इंजिनीअरनी कामे करू नये वस्तुस्थिती काय आहे. केव्हा सुरू होणार खुलासा घेण्यात यावा.

श्री.गजानन बारवाल :वार्ड कार्यालयात मजूर कर्मचाऱ्यांच्या बदलीवर दिले ते हजर झाले नाही स्वच्छता होत नाही त्यांचे म्हणणे तरी काय याची चौकशी करावी व वार्डातील सर्व ठिकाणी स्वच्छता होईल याकडे प्रशासनाने लक्ष दयावे.

श्री.सिताराम सुरे : वार्ड क्र.२ मधील डीपी रोडवरील एक कामाचे दोन महिण्यापूर्वी टेंडर झाले कामास सुरूवात झाली नाही विचारणा केली असता खालचे अधिकारी मा.आयुक्तांनी कामे बंद करण्यास सांगितले असे उत्तर देतात. त्या भागातील लोकांनी १०० टक्के विकास शुल्क भरणा केलेला आहे सध्या नागरिकांना चिखलातून ये-जा करावी लागते. विकासाच्या आवश्यक कामात ते काम येते तात्काळ सुरूवात करण्यात यावी.

श्री.महेश माळवतकर :एप्रिल महिण्यापासून विकास कामे बंद आहे. एन-९ भागात किर्ती मंगल कार्याजवळील नाल्याचे कामाचे टेंडर होवून सहा महिणे झाले संरक्षित भिंत बांधण्याची आवश्यकता असतांना वर्क ऑर्डर मिळत नाही. सेव्हनहिल ते टी.व्ही सेंन्टर चौकापर्यंतचे डिफर पेमेंन्टमधुन रस्त्याचे काम चालू असून किर्ती मंगल कार्यालय ते टी.व्ही सेंन्टर पर्यत गेल्या दीड महिण्यापासून रस्ता खोदून ठेवला हा रस्ता रहदारीचा असल्याने जास्तीचे अपघात होत आहे यास जबाबदार कोण असणार आहे. ठेकेदारास काम का करीत नाही विचारणा केली असता बिलाचा विषय पुढे करतात वर्तमान पत्रात येते की तिजोरीत खडखडाट जकातच्या माध्यमातून तसेच मालमत्ता कराचा भरणा वार्ड कार्यालय ब व फ मध्ये लोक रांगेत उभे राहून करीत आहे. असे असतांना विकास कामे का बंद आहे उत्तर मिळत नाही. कोण जबाबदार राहील. नागरीकांना बेसीक सुविधा देण्याची गरज आहे मा.महापौर व मा.आयुक्त यांनी त्या रस्त्याची पाहणी करावी वसुली करण्याकडे प्रशासनाचे लक्ष असावे वसुली करण्याची जबाबदारी ही प्रशासनाची आहे नगरसेवक वसुली करण्यास विरोध अडथळा आणत नाही वसुलीचे टारगेट ठरवून दयावे

जे वसुली करणार नाही त्याचेवर काय कार्यवाही होणार आहे. कमीत कमी रक्कमेचे अत्यावश्यक काम होण्यास अनेक कारणे दाखवली जातात. वेळेवर होत नाही रस्ता रूंदीकरण होत असतांना अतिक्रमण काढले जात आहे त्याबद्दल प्रशासनाचे अभिनंदन परंतू जनतेला मुलभूत सुविधा पाणी,लाईट, ड्रेनेज ची कामे व्हावी प्रशासनाला लक्ष देण्याचे आदेशीत करावे.

श्रीमती अजरा जबीन :सहा महिण्यापूर्वी माझे वार्डातील रस्त्याचे काम सुरू केले होते. काम पूर्ण झाले नाही. अतिक्रमण हटवून रस्ता क्लिअर केला होता. रस्त्याचे काम केले नाही. रस्त्यावर तीन ते चार शाळा असून विदयार्थ्यांना नागरीकांना जा-ये करण्यास त्रास होत आहे तसेच वार्डातील मुख्य जल वाहिनीचे काम अर्धवट असून एक काम पुर्ण केल्यानंतर दुसरे कामास सुरूवात झाली पाहिजे. पोलीस मेस ते कटकट गेट पर्यत रस्त्याचे काम करणे आवश्यक आहे. अनेक रस्ते कटकट गेट जवळ येवून मिळतात. या रस्त्यावरिल नळ तोडले परंतु योग्य प्रकारे बंद न केल्याने रस्त्यात पाणी साचते अडथळे निर्माण होतात काम हातात घेतले तर पुर्ण करावे वार्डात लहान पाण्याच्या लाईन टाकण्याची गरज आहे बजेटमध्ये तरतूद आहे परंतू सध्या सर्वच काम बंद असल्याचे अधिकारी उत्तर देतात. तीन वर्षात एकही काम पूर्ण होत नसेल तर बरोबर नाही प्रथम आमचे २-३ विकास कामे तरी पूर्ण करण्यात यावे तसे प्रशासनाला आदेशीत करावे.

श्री.शशांक विसपुते :अनेक विकासाची कामे बंद आहे. गुंठेवारीतील कामे थांबायला नको. लोकांनी गुंठेवारी भागातील कराचा भरणा केला कामाचे टेंडर झाले प्रशासनाने उशीर कार्यवाही केल्यामूळे ४-५ महिण्यानंतर त्याच कामाचे रेट वाढले त्यामूळे ठेकेदार काम करण्यास तयार नाही. यास कोण जबाबदार आहे. जो जास्तीचा लागणारा खर्च कोण करणार आहे. लोक गुंठेवारीची रक्कम भरण्यास तयार आहे. त्याच वेगाने त्या भागात कामे झाली पाहिजे. माझ्या वार्डात दोन पाईपलाईनचे काम बंद पडले. किती रक्कमेपर्यत वार्डात कामे करता येतील त्या नुसार स.सदस्य त्या-त्या कामास प्राधान्य क्रम देवून यादी देतील त्यानुसार करता येतील स्वेच्छानिधीतून आवश्यक असलेली कामास तरी किमान सुरूवात करावी.

श्री.संतोष खेंडके :गजानन महाराज मंदीर चौक ते जयभवानी चौक पर्यंतच्या रस्त्याचे डिफंर पेमेन्टवर काम चालू होते ते सध्या बंद केले. त्या रस्त्यावर दररोज ४-५ अपघात होऊन संबंधीत पोलीस स्टेशनला केसेस होतात. एक साईडने वाहतूक चालू आहे. त्वरीत त्या रस्त्याचे काम हाती घ्यावे मलेरिया विभगाकडून औषधी फवारणीचे काम हाती घेण्यात यावे. शहरात स्वच्छता होणे गरजेचे असून गुंठेवारीच्या माध्यमातून जमा होणारी रक्कम व बजेट याचा संबंध येत नाही. या रक्कमेतून काम करण्यास अडचण यायला नको परंतू अशी कामे सुध्दा होत नाही. प्रशासनाच्या दिरंगाईमूळे काम लांबणीवर पडते व रेट वाढल्यानंतर ती कामे ठेकेदार करण्यास तयार नसतात. यामूळे नागरीकाचा दोष नसतांना त्रास सहन करावा लागतो याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

श्री.संजय जगताप :नवीन मा.आयुक्त आल्यापासून झोपडपट्टीतील तसेच शहरातील इतर सर्व विकास कामे बंद आहे ती होण्यासाठी स.सदस्य व नागरीक परेशान आहे मा.आयुक्तांचे काहींनी अभिनंदन केले. सर्व परेशान आहेत रस्ता रूंदीकरण करतांना शहरातील मंदीर,मस्जीद,धार्मीक स्थळे हटविली जात असून वार्ड

अधिकाऱ्याने सर्वे करून चुकीची माहिती दिली नागरीकांच्या भावना दुखावल्या जात आहे याकडे प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे. आठवडयातून दोन दिवस मा.आयुक्त यांनी महापालिका कार्यालयात येवून काम करावे. ते त्यांचेने होत नसेल तर त्यांना परत पाठविण्याचा या सभागृहाने ठराव घ्यावा. नागरीकांसाठी मुलभूत सुविधा पुरविण्याची कामे होत नसेल तर अर्थ नाही.

श्रीमती मोमीन सफिया :वार्ड क्र.९६ मध्ये १५-२० लक्ष गुंठेवारीच्या माध्यमातून लोकांनी भरणा केले. त्या रक्कमेतून कोणतेही विकास काम केले नाही वार्डातील जनतेसाठी पिण्याच्या पाण्याची लाईन टाकण्यात यावी. वार्ड अधिकारी वार्ड अभियंता याकडे लक्ष देत नाही. विकास कामे केली तरच लोक गुंठेवारी भरण्यास पूढे येतील.

सौ.रजनी जोशी :सर्वांना विचारून वेळ घालवू नका सर्वांचे म्हणने आहे काम होत नाही वार्डात विकास कामे सुरू करावी. मा.आयुक्तांनी वार्ड अभियंत्यांना पत्र दिले जी कामे स्पील ओहरमध्ये आहेत त्यांचे कार्यादेश दिलेले नाही.

सौ.लता दलाल :मागिल वर्षीच्या बजेटमधील अनेक कामे ठेकेदाराची बिले दिली गेली नाही म्हणून अर्धवट आहे. या वर्षातील आठवा महिना आहे.नवीन कामाचे अदयाप अंदाजपत्रक नाही. ते लवकर करण्यात यावे. अत्यावश्यक कामे करावी मा.आयुक्तांनी काय आदेशीत केलेले आहे वृत्तपत्राच्या माध्यमातून वाचण्यात आले. आर्थीक समस्या आहे जकातीच्या माध्यमातून येणाऱ्या कराच्या उत्पन्नातून विकास कामे करण्यास प्राधान्य दिले पाहिजे. थांबविलेली कामे केव्हा करणार नागरीक सदस्यांना विचारणा करतात वसुली होत नाही म्हणून कामे करता येत नाही प्रशासनातील यास कोण जबाबदार आहे हे मा.आयुक्तांनी शोधावे. प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या चुकामूळे नगरसेवक व नागरीकांना त्रास सहन करावा लागतो त्यासाठी तात्काळ विविध नवीन कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यास प्रशासनास सुचना देण्यात यावे. गुंठेवारीच्या भागातील ही कामे अर्धवट आहे तीही सुरू करण्याची कार्यवाही करावी.

श्री.मो.जावेद मो.इसाक:पुर्ण शहरात विकास कामे होत नाही. अंदाजपत्रक तयार होत नाही स्पील ओव्हरची कामे सुध्दा बंद आहे. ज्यांनी आम्हाला निवडूण दिले ते लोकांचा रोष आमच्या बाबतीत वाढेल. कामे होत नसेल तर बॉडी बरखास्त करण्या बाबत शासनाकडे शिफारस करावी व एक महिण्यात किती वसुली व किती खर्च होत आहे यांचा संबंधीत अधिकारी यांचेकडून खुलासा घ्यावा. तसेच येणारा पैसा कसा खर्च होतो याचा ही तपाशिल मिळावा.

श्री.सय्यद खुसरो :जे बजेट दाखल केले ते योग्य की अयोग्य आहे. त्यांचे ऑडीट झाले का याचाही खुलासा करावा. कोणतेही विकास काम होत नाही.म्हणून नागरीक आम्हाला जाब विचारतात. ३ लक्षचे काम होत नाही. तसेच जाफरगेट व क्रांतीचौक भागात महापालिकेची ६ एकर जागा असून त्या ठिकाणी महापालिकेने महापालिकेच्या जागेवर बांधकामास परवानगी दिली.जे जबाबदार असतील त्यांचेवर प्रशासन काय कार्यवाही करणार आहे.याचा खुलासा घेण्यात यावा. माझे वार्डातील मस्जीद व मंदीरचा जो रिपोर्ट दिला तो चुकीचा आहे रस्ता सोडून ३०० फुट आत मध्ये आहे. जो रिपोर्ट चुकीचा दिला व शहरातील नागरीकामध्ये वातावरण खराब केले त्या बाबतीत कार्यवाही करावी.मस्जीद मंदीरची नोंद राजपत्रात आहे जी यादी केली

त्यावर आक्षेप घ्यावे लागेल, वार्ड अधिका-यांनी मा.आयुक्तांना अंधारात ठेवले दर्गाह ५०० फुट दूर आहे त्याचे नाव दिले.

याच वेळी मा.महापौर डायस समोर स. सदस्य मोठमोठयाने बोलतात स्पष्ट ऐकू येत नाही.

मा.महापौर :एका वेळेस एकच सदस्यांनी बोलावे.सर्वांना बोलण्याची संधी मिळेल एका नंतर एकाने बोलावे ज्या सुचना सदस्यांनी केल्या त्याचे खुलासा प्रशासनाकडून घेणारच आहोत.

श्री.भाउसाहेब ताठे : ६ महिण्यापासून विकास कामे बंद आहे ती सुरू करावी. वार्ड कार्यालय ब अंतर्गत येणा-या भागात वसूली झाली असतांना पूर्णपणे कामे बंद आहे मागिल बजेटमधील स्पील ओव्हरची तसेच नवीन बजेट मधील कामे करण्याची गरज आहे दोन वर्षापासून सिडकोचे हस्तांतरण झाले तेथे उपआयुक्त नाही. या भागातील वसूली चांगल्या प्रकारे आहे. विकास कामे व्हावी तसेच औषध फावरणी होत नाही व स्वच्छतेचे काम ही व्यवस्थीत होत नाही याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

श्री.हिम्मतराव दाभाडे :स्पील ओव्हरची कामे होणे बाकी आहे. नवीन कामे केंव्हा होणार आहे. ज्या ज्या वार्डातील बजेटनुसार विकास कामे करणे बाकी आहे ती सुरू करण्यात यावी. वार्डातील विकास कामे होत नाही म्हणून नागरीक आमच्यावर रोष धरतात. आवश्यक ती विकास कामे होणे गरजेचे आहे.

श्री.अनिल जैस्वाल :माझे वार्डात चार महिण्यापासून पाण्याची एक लाईन फुटलेली आहे.ती दुरूस्त करण्यासाठी बजेट नाही असे अधिकारी उतर देतात.वसुली होत नाही मार्च मध्ये एक फुटपाथच्या कामाची वर्क ऑर्डर झाली अदयाप काम सुरू झाले नाही. ते करण्यात यावे किंवा फरशी टाकावी तसेच वार्डात औषधी फवारणी व स्वच्छता साफसफाई नाही याबाबतीत अधिका-यांवर काय कार्यवाही करणार.

श्री.सलीम खान :बजेटमध्ये तरतूद केल्याप्रमाणे विकास कामाचे टेंडर होते २-२ महिने मुख्यलेखाधिकारी सही करीत नाही. विकास कामासाठी बजेट नसेल तर सभा घेवून अर्थ नाही.महापालिकेला प्रशासन कशासाठी आहे. जनतेला मुलभूत सुविधा देण्यासाठी विकास कामे सुरू करावी.महापालिकेकडे मा.आयुक्तांनी लक्ष दयावे पैसे येतात कसे मागिल बजेट व सन २००८-०९ ची कामे ही होत नाही.

श्री.संजू रिडलॉन :मा.आयुक्त यांनी एक परीपत्रक काढले की अत्यावश्यक कामे करण्यात यावी माझे वार्डात पाण्याचे लाईनचे एक काम एका वर्षापासून प्रलंबींत आहे चर्चा करावी म्हणून शेरा आहे. ड्रेनेज लाईनचे पाणी पिण्याच्या पाण्याच्या लाईनमध्ये जात आहे. ते काम होत नाही म्हणून नागरीकांचा रोष आहे धरणे आंदोलन करतील.चर्चा करून हे काम तात्काळ करावे.दर ४ दिवसांनी दुरूस्ती करावी लागते.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :वार्डात विकास कामे व्हावी ही सर्वाची भावना आहे.मा.आयुक्तांनी कोणते कामांना प्राधान्य दयावे या संदर्भात परीपत्रक काढले. परंतू अधिका-यामध्ये निगेटिव्ह प्रचार होत आहे की मा. आयुक्तांनी सर्व कामे बंद केली.स्थायी समितीने बजेट मजूंर केल्यानंतर ते प्रोसेस मध्ये असते. त्यानुसार कामे व्हायला पाहिजे. आज रोजी एकही कामाचे अंदाजपत्रक तयार नाही विचारणा केली असता ते करू नये असे उत्तर दिले जाते. बजेटमध्ये तरतूद केली असल्यास सदस्यांचे पत्र येतील न येतील अंदाजपत्रक तयार करणे प्रशासनाचे काम असते. एकदा टेंडर झालेनंतर जे संबधीत कार्य. अभियंता

असतात ते फायनल ऑथरीटी असते. परंतु येथील प्रथा अशी की टेंडर काढले सर्व कार्यवाही लेखा विभागाकडून होते.लेखा विभागाकडून अशी कामे करून घेवून वेळ वाया घालवू नये. बील मंजूर करण्यासाठी लेखा विभागाकडे गेल्यास हरकत नसेल.या सर्व गोष्टीला नवीन पायंडा पाडून सर्व कार्य. अभियंता यांना जबाबदारी देवून ठराविक या वर्षात किमान २०-२५ लक्ष पर्यत एक एक विभागाकडून कामे झाली पाहिजे लहान रक्कमेची कामे सुध्दा बजेट नसल्याने होत नाही.जो निगेटिव्ह पध्दतीने काम चालू आहे ते पॉजीटयूव्ह पध्दतीने करण्याचा प्रयत्न करावा. सर्व अधिका-यांना काम दयावे.कोणत्या विभागाचे किती काम होत आहे माहिती घेतली जावी. नागरीकांना सुविधा मिळेल याकडे लक्ष देण्याची गरज असून प्रत्येक विभागाचे संबधीत अधिकारी यांनी दुपारच्या नंतर नागरीकांच्या तक्रारी ऐकूण घेण्यासाठी व त्याच बरोबर विकास कामे होण्याच्या दृष्टीने कार्यालयात उपस्थित असणे आवश्यक आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:तीन वर्षापासून बजेट फुगवून दाखविले जाते.परंतु वसुली २०० ते २३० कोटीपेक्षा जास्त होत नाही.अंदाजपत्रक वाढवून दिले जाते. आजही ८० कोटीचे स्पील ओव्हर आहे. आजही ठेकेदाराचे ५.५० कोटी रक्कम देणे बाकी आहे. कुणी ठेकेदार काम करण्यास तयार नाही टेंडर काढून उपयोग नाही.काढले तरी घेण्यात तयार नाही घेतले तरी दुप्पट रेट येते. स्पील ओव्हरचे कामे सत्ताधारी व जे पावरफुल त्याचे काम प्रथम होते काही वार्डात गेल्या वर्षी ४०-५० लक्षचे कामे झालेली त्याच वार्डात पुन्हा बजेटमध्ये १-५० कोटी पर्यत तरतूद आहे ते निश्चींत आहे विरोध पार्टीचे सदस्य यांचे वार्डात पुर्वी ही कामे झाली नाही व आताही होत नाही.नवीन बजेटनुसार जी जी आवश्यक कामे आहे ती करण्यासाठी मा.आयुक्त व पदाधिकारी यांनी बसून कोणत्या भागातील किती अत्यावश्यक कामे करू शकतात या बाबतीत योग्य तो निर्णय घ्यावा.विकास कामे होत नसेल तर बॉडीचा असून फायदा नाही. पॉझीटिव्ह भुमिका ठेवून प्रशासनाने अत्यावश्यक कामे ६७(३)नुसार करावे तसे अधिकार त्यांना दयावे.गुरूतागद्दीची कामे झाली नाही.

श्रीमती मेहरून्नीसा खान:पोलीस मेस पासून डीपी रोड लिगल नळ कनेक्शन कट करण्यात आले तेथे लहान पाईपलाईन नाही ती टाकण्यात यावी. २००८ पर्यत तेथील नागरीकांनी टॅक्स भरणा केला सदर रस्त्याचे ३० टक्के काम झालेले असून उर्वरीत कामाचे मटेरियल पडलेले आहे. या रस्त्याच्या लगत ५-६ शाळा आहे. विदयार्थ्यांना जा-ये करण्यास त्रास होतो. स्पीलओव्हरची तसेव अर्धवट राहिलेली कामे सुरू करावी.ड्रेनेज फुटले आहे रोगराई पसरेल महापालिकेची बदनामी होते.

श्री.सतीश कटकटे :प्रभाग ड सफाई खाजगीकरण ठेका रद्द केला २५० मजूर दिले कांही रूजू झाले नाही.वार्डातील साफसफाईसाठी कर्मचा-यांना सर्व साहित्य देण्यात यावे.

सौ.पार्वती वाघमारे :माझे वार्डात जवळपास १०० टक्के लोकांनी गुंठेवारीची रक्कम भरणा केली सुविधा एक ही दिली जात नाही पाण्यासाठी लोकांनी गुंठेवारी भरणा केली आहे. पाईपलाईन टाकून दयावी म्हणून सहा महिण्यापासून मागणी करीत आहे. परंतू काम केले जात नाही. पिण्याचे पाण्याचे टॅंकरही बंद झाले. पाणी दिले नाही तर कुणीही नागरीक टॅक्स भरणा करणार नाही.नागरीक मोर्चे आंदोलन करतील.

श्री.काशिनाथ कोकाटे :जाने.२००८ पासून जवळपास सर्वच विकास कामास गती नाही. या बाबतीत अनेक वेळा विचार विनिमय होवून कोणताही निर्णय लागलेला नाही. आताच एक सदस्यांनी म्हटले की उत्पन्न कमी बजेट फुगवून दाखविले जाते त्यामुळे हा प्रश्न निर्माण होतो. परंतु बजेट करतांना शासनाकडून येणारा निधी जकात व मालमत्ता कर तसेच पाणीपट्टीच्या माध्यमातून येणारे उत्पन्न याचा विचार करूनच बजेट केले जाते. ६० कोटीच्या डिफर पेमेन्ट वर कामे करू नका मी म्हणत होतो. आज ती चालू असलेली कामे संपूर्णतः बंद आहे मोठमोठया डीपी रोडवर ही कामे चालू आहे वाहतूक अडथळा निर्माण होत आहे. सेव्हनहिल आझाद चौक ते टीव्ही सेन्टरचा संपूर्ण रस्ता खोदून ठेवला पावसाचे पाणी कुठे जाईल यांचे सुध्दा नियोजन केले नाही. आझाद चौकात अगोदर रस्ता केला नंतर पेव्हर ब्लॉक बसविले त्याचा स्लोप कुठे किती अतंरापर्यत किती क्षेत्रफळापर्यत टाकणार याचा ताळमेंळ लागत नाही.तेथे एजन्सीचे कुणीही दिसून येत नाही महापालिकेचेही अधिकरी नसतात. पीएमसीला दोन अडीच टक्केने काम दिले जाते त्याची जाणीव महापालिकेने ठेवली पाहिजे. ज्या क्वालीटीची खडी पाहिजे ती तेथे टाकलेली नाही. दुसरेच रॉमटेरियल वापरले आहे जेंव्हा लाखो रूपये खर्च केला जातो त्याचा विनियोग कसा होतो याकडे लक्ष देण्याची गरज आहे. ३-४ महिण्यापासून रस्ते रहदारीसाठी बंद आहे हीच परीस्थिती गजानन महाराज मंदीर चौक ते जयभवानी चौक तसेच एन-३ ते मुंकूदवाडी रेल्वेस्टेशनपर्यतच्या रस्त्याची आहे तीन वर्षात हा रस्ता होवू शकत नसेल योग्य नाही संबधीत एजन्सीला बोलवून त्यांचेशी चर्चा करून कार्यवाही का होत नाही अधिका-यांचे याकडे लक्ष असणे आवश्यक आहे. जेवढे काम करणे शक्य होते तेवढेच काम त्या ठैकेदाराने घ्यायला पाहिजे होते. पेमेंन्ट होत नाही म्हणून काम थांबविणे हे चुकीचे आहे. सिडकोतील व इतर गुंठेवारीच्या भागातील ही कामे बंद आहे जो नागरीक दोन वर्षापूर्वी ५०० रू टॅक्स भरणा करीत असे तो १७ हजार भरणा करावा लागतो.सिडकोकडे असतांना तक्रार केल्यानंतर त्या त्या सुविधा देण्याची कार्यवाही दुस-याच दिवशी होत असे आता महापालिका १-१ महिण्यानंतरही कार्यवाही करीत नाही अशी परीस्थिती असणे योग्य नाही.वॉर्ड कार्यालय ब चे वसूलीचे उद्यिष्ठ ८.३२ कोटीचे असून आजची वसुली ४.४३ कोटी पर्यत म्हणजेच ५० टक्के पेक्षा जास्त वसुली झालेली आहे.असे असतांना जर त्या भागात नागरीकांना सेवासुविधा दिल्या जात नसेल तर योग्य नाही जनतेची कामे झाली नाही तर आमच्या राजकारणावर त्यांचा परीनाम होणार आहे. अधिका-यांचे पगार बंद होणार नाही.१०० टक्के वसुली ज्या ज्या ठिकाणी होत असेल तर त्या भागात १०० टक्के काम सुध्दा झाली पाहिजे. अनेक ठिकाणी ५०० फुट रस्त्याचे काम असेल तर ३०० फुट रस्ता केला २०० फुटासाठी निधी नाही असे सांगितले जाते. या वर्षाच्या बजेट मधील कामे कशी करायची याचे नियोजन करता येईल परंतू स्पिल ओव्हरची कामे का बंद ठेवली. जे काम ७५ टक्के झाले ते सुरू करण्याचा निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. शिक्षण विभागाचा जो शासनाकडून निधी यायला पाहिजे तो आलेला नाही. विशेष अनुदान आलेले नाही. सर्वांचे अभिनंद होते निधी कुणाचाही आलेला नाही हे योग्य वाटत नाही. सिडकोसाठी एक स्वतंत्र उपआयुक्त नियुक्त करावे. जेणे करून नागरीकांच्या समस्या सुटण्यास मदत होईल.

श्रीमती मसरत बेगम :नवीन मा.आयुक्त यांनी अतिक्रमणाकडे लक्ष वेधीत केले आहे. परंतू त्याच बरोबर विकास कामाकडे लक्ष देण्याची गरज आहे. स्पील ओव्हरची बजेटमधील कामाचे अंदाजपत्रक तयार होत नाही हा प्रश्न एकाच वार्डातील नसून अनेक वार्डात हीच परीस्थिती आहे. पाणी,लाईट,रस्ते,ड्रनेज,आरोग्य या बेसीक सुविधा नागरीकांना दिल्या पाहिजे. अनेक रस्त्यावरील आजही ५० टक्के लाईट बंद असते स्वच्छता व्हावी पिण्याचा पाण्याचा प्रश्न शहरात सर्वच भागात भेडसावत आहे. अतिक्रमण मोहिम सुरू केली त्याप्रमाणेच पिण्याचा पाण्याचा प्रश्न तसेच स्वच्छता होईल याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

श्री.मिलींद दाभाडे :७-८ महिण्यात एकही विकास काम माझे वार्डात झालेले नाही मा.आयुक्तांनी कामे बंद केल्याचे अधिकारी उत्तर देतात मा.आयुक्त यांनी दिलेले आदेश काय आहे तो वाचून दाखवावे व स.सदस्य श्री.सय्यद खुसरो यांनी विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा व्हावा.

श्री.प्रल्हाद निमंगावकर :वार्डातील नागरीकांनी १०० टक्के विकास शुल्क भरणा केले मा.आयुक्तांनी कामे न करण्याचे सुचना दिल्या असे उत्तरे वार्ड अधिकारी यांचेकडून मिळते. मेहरनगरमध्ये महापालिकेच्या जागेवर काही लोकांनी खोटे कागदपत्र तयार करून अतिक्रमण केले त्यांनी मा.न्यायालयाकडून परवानगी आणली या प्रकरणी मा.न्यायालयात काय परीस्थिती आहे विधी सल्लागार यांना विचारणा केली असता प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याचे म्हटले जाते. ज्यानी या प्रकरणात भ्रष्टाचार केला त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी.

श्री.सतीष कटकटे :या जागेच्या संदर्भात मा.न्यायालयात काय परीस्थिती आहे प्रशासनाने माहिती दयावी. महापालिकेच्या इतर ठिकाणच्या जागेवर झालेल्या अतिक्रमणाकडे प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.

श्री.संजू रिडलॉन :जाफरगेट गेट भागात मॉर्डन मिडल शाळेने अतिक्रमण केले बाबत प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले होते अद्याप कार्यवाही केली नाही. बाजूलाच महापालिकेची ताब्यातील दोन ते अडीच मीटर जागा त्यावर परवानगी दिली परंतू पक्के बांधकाम झालेले आहे. क्रांतीचौक जालना रोडचा काही भाग माझे प्रभागाला लागून येतो. रस्त्यावर हातगाडया टपऱ्या उभ्या असतात हॉकर झोन म्हणून कार्यवाही होणार होती कुठपर्यत आलेली आहे. क्रांतीचौक हा शहरातील मुख्य भाग असून तेथूनच धार्मीक कार्यक्रमास रॅली वगैरे काढण्यास तेथूनच सुरूवात होते. या चौकाच्या बाजूलाच हातगाडीवर काही लोक मांसमच्छी विक्री करतात सकाळी बघीतले तर तेथे मोठया प्रमाणात घाण कचरा दिसून येतो. याकडे लक्ष देण्यात गरज आहे.

सौ.कला बोरामणीकर :समर्थनगर भागात बजरंग शाळा परीसरात महापालिकेच्या जागेवर अतिक्रमण झाले प्रकरण न्यायालयात न्यायप्रविष्ठ झाले योग्य वेळी महापालिकेकडून पाठपुरावा न झाल्यामुळे महापालिकेच्या विरोधात निकाल गेला जागेला संरक्षित भिंत होती. बाजूला काही भाग वगळलेला होता त्यावर लोकांनी मातीची घरे बांधलेली आहे. या बाबतीत तात्काळ कार्यवाही होण्याची गरज आहे. ती महापालिकेची खुली जागा आहे.

मा.महापौर :सर्वच भागात ७-८ महिण्यापासून विकास कामे बंद असून तसेच गुंठेवारी निधीतून होणारी कामे सुध्दा बंद आहे आताच सदस्यांनी आपआपले मत व्यक्त केले विकास कामे व्हावी ती झालीच पाहिजे असे सर्वांनाच वाटते. बजेट मधील विकास कामे सुरू कशी करता येतील त्यासाठी काय

उपाययोजना आखता येतील या संबधी मा.प्रशासनाने सविस्तर असे निवेदन सभागृहात करावे.

श्री.सय्यद खुसरो :माझे वार्डात रस्ता रूंदीकरण करतांना २०० फुट आत असलेल्या दर्गा बाबत चुकीचा रिपोर्ट वार्ड अधिकारी यांनी दिला त्यांचेवर काय कार्यवाही करणार आहे.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय:नांदेड येथे गुरूतागदी या धार्मीक कार्यक्रमासाठी येणाऱ्या भाविकांच्या व्यवस्थेसाठी १ कोटीची तरतुद या सभागृहाचे मंजूर केली ४५दिवस शिल्लक असून या कालावधीत हे काम होणार आहे.त्या बद्दल सभागृहाचे मी व माझे समाजाच्या तसेच गुरूतेग बहादुर संस्था ३ गुरूद्वारा तर्फे अभिनंदन करतो.

श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ :गुरूतागद्यी कार्यक्रम नांदेड येथे होणार पण येथे श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय यांनी पुढाकार घेवून निधी मंजूर करून घेतले त्यांचे अभिनंदन.

श्री.सतीष कटकटे :स्वच्छतेसाठी वार्ड कार्यालयात कर्मचारी दिले ते रूजू झाले नाही स्वच्छतेचे काम विस्कळीत झालेले आहे.

मा.महापौर :जे जे मुद्ये स.सदस्यांनी उपस्थित केले त्या संबंधी प्रशासनाने व्यवस्थीत खुलासा करावा.

मा.आयुक्त :मी आपण सर्वांचे ऐकूण घेतले भावना समजू शकतो कामे होणे रास्त आहे. जास्तीत जास्त वार्डात विकास कामे व्हावी म्हणून प्रत्येक स.सदस्यांना अपेक्षा असते सर्व काही करता येते परंतू पैशाचे सोंग आणता येत नाही हे आपणा सर्वांना माहित आहे. तीन वर्षाचे वसुलीचे बजेट २१५ ते २३५ कोटीच्या वर गेलेले नाही. वसुली जास्त होईल,शासनाकडून ७० कोटीचे अनुदान येतील.अशी कल्पना ठेवून पुर्वीच्या आयुक्तांनी ३३४ कोटीचे बजेट केले जास्तीत जास्त कामे व्हावी ही अपेक्षा ठेवून पुन्हा सभागृहाने वाढ केली ४०० कोटीपर्यत गेले. प्रत्यक्ष वसुली व ठेवलेले बजेट यात मोठी तुट आता दिसून यायला लागली. सन २००७-०८ बजेट मधील ११० कोटीची स्पील ओव्हरची कामे ऑलरेडी मंजूर आहे.या वर्षीच्या बजेटमध्ये तरतूद केली नसेल तरी ती आगोदर करणे आवश्यक असते. नंतर नवीन कामा करण्याकडे लक्ष देणे क्रमप्राप्त असते. वार्डात रस्ते,स्वच्छता,नियमीत पाणीपुरवठा तसेच लाईट ई. सुविधा असल्यास सदस्यांकडे येणाऱ्या तक्रारी कमी येतात त्यावेळी वार्डात चांगल्या प्रमाणात कामे झाली असे वाटू लागते.जास्तीचा निधी उपलब्ध असेल तर मोठी विकासाची कामे उद्यान असेल, रस्ते असतील हे त्यात प्रामुख्याने घेतो. हे व्हावे अशी प्रशासनाची नियमीत धारणा असते.त्या अपेक्षेनेच पुढे जातो. विकास कामाच्या संदर्भात आयुक्त म्हणून जे आदेश काढले त्यात असे म्हटले की , माझे असे निदर्शनास आले आहे की शहरामध्ये मोठया प्रमाणात वेगवेगळी कामे मंजुर झालेली आहेत. तथापी या कामासाठी प्रत्यक्षात आर्थिक तरतुद उपलब्ध नाही त्यामूळे खालील कामाशिवाय इतर कामे हाती घेण्यात येऊ नये या पार्श्वभूमीवर खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे. यात रस्ता रूंदीकरण, रस्त्यांची देखभाल व दुरूस्तीची कामे तसेच नविन विकास योजना अंतर्गत नवीन रस्ते,पाणी पुरवठा संदर्भात अत्यावश्यक कामे, मल:निसारण संदर्भात अत्यावश्यक कामे, दिवा-बत्ती व पथदिवे संदर्भात अत्यावश्यक कामे, राज्य व केंद्र शासनाकडून प्राप्त अनुदानातील कामे.या कामाना प्राधान्य देण्यात यावे असे म्हटले आहे. वरील प्रमाणे फक्त अत्यावश्यक कामे तेवढीच हाती घेण्यात यावेत. या शिवाय अर्थसंकल्पामध्ये मंजुर असलेली इतर कामे

सद्यस्थितीत हाती घेण्यात येऊ नये त्यांचे अंदाजपत्रके सादर करण्यात येऊ नयेत. अर्थसंकल्पानुसार मंजुर असलेली कामे सुरू असतील तर ती कामे पुढील आदेशापर्यंत थांबविण्यात यावीत. किती रक्कम येत आहे व किती येणार आहे याचा विचार करून कामे करणे योग्य आहे. जानेवारीमध्ये काही ठेकेदारांनी कामे पुर्ण केली परंतू त्याचे पेमेंन्ट दिले गेले नाही.२४०कोटीचा निधी असेल तर ५० टक्के हा पगारावर खर्च होतो.५० टक्केच शिल्लक असतो टारगेट वाढीव ठेवले जाते तेवढी वसूली होत नाही. हे नुसतेच भुषण होते. जी वस्तुस्थिती आहे त्या प्रमाणे कामे करण्याचा प्रयत्न होतो. ही परीस्थिती जास्त बिकट होवू नये कारण जो काम करतो त्यांना कामाचा मोबदला मिळालाच पाहिजे यात शंका नाही. टेंडर काढून सुध्दा ठेकेदार काम घेण्यास पुढे यायला तयार नाही. काम केल्यानंतर पेमेंन्ट मिळेल याची गॅरंन्टी त्यांना नाही.या परीस्थितीमूळे टेंडर काढल्यानंतर रेट सुध्दा जास्त येतात.म्हणून हे सर्व नियोजित ठेवून कामे झाली पाहिजे. जुन्या प्रभागात भरपूर कामे झालेली आहे नवीन प्रभागात जास्त प्रमाणात कामे हाती घ्यावी लागतील.गुंठेवारी भागात कामे करण्याची गरज आहे तेथील परीस्थिती बघण्यासारखी नाही तेथे गेल्यानंतर शहरात आहे असे वाटत नाही. अनेक ठिकाणी गड्डे असून कनेक्शन नाही. रस्ते व्यवस्थीत नाही. वाहन जात नाही अशी परीस्थिती आहे. गुंठेवारी रेग्युलाईन करून रस्त्यासाठी कमीत कमी ९ मी.रूंद जागा आवश्यक आहे जा-ये करण्यासाठी मोठे रस्ते असणे आवश्यक आहे अशा भागात डिपी रस्ते नसताातच जेथे रस्ता संपादन केले तेथे प्रथम डब्ल्युबीएम रोड करावा पावसाळा जातो. टॅक्स कमी असावा असे प्रत्येक नागरीकांला वाटते महापालिकेचे उत्पन्न लिमीटेड जकात पासून ११२ कोटी येते विकास कामे करायची असेल तर टॅक्स वाढविणे वाईट निर्णय असला तरी आज उदया वाढवावा लागेल.जास्तीत जास्त उत्पन्न येण्याचा आपला प्रयत्न असावा तो प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष करदात्याकडून मिळवू शकतो जे जे विकासक पुढे येणार त्यांचे कडून रस्ते विकसीत करून अेडीशनल चार्जेस त्यांचेकडून घेवू शकतो यामूळे विकासाला मदत होते.हे प्लॅनीगने करणे आवश्यक आहे.प्रत्येक पालिका सदस्यांना आपआपल्या वार्डात विकास कामे जास्त व्हावी असे वाटते परंतु वस्तुस्थिती आताच सांगितली कोणकोणती अत्यावश्यक कामे असून ती प्राधान्याने घ्यायची याची यादी घेतली जाईल. १० लक्ष पर्यतचे सर्व अधिकार सर्व कार्य.अभियंता यांना दिले आहे. अनेक विकास कामाच्या संचिका आता माझेकडे मान्यतेसाठी येण्याची गरज नाही.

श्री.संजय जगताप :अधिकारी हे ठेकेदाराचीच कामे करतात प्रशासनाने त्यांचेवर विश्वास ठेवू नये अधिकार देणे चुकीचे आहे संचिका आयुक्त म्हणून आपण वाचून घेतली पाहिजे. आठवडयातून दोन दिवस मा.आयुक्तांनी महापालिकेत असावेत. जेणे करून सर्व अधिकारी जागेवर राहतील.

मा.आयुक्त :असे म्हणणे असेल तर नवीन आयुक्त घेणे सोयीस्कर राहील. विभागीय आयुक्तांचा चार्ज माझेकडे असला तरी माझे इकडे लक्ष आहे. इथे जास्त वेळ बसणे शक्य होत नाही.

श्री.संजय जगताप : अधिकारी आमचे प्रश्न समजावून घेत नाही काम करणारे प्रशासन पाहिजे दुरध्वनी वरून संपर्क साधला असता उचलत नाही आम्हाला नागरीकांच्या समस्या मांडण्यासाठी मा.आयुक्तांनी महापालिकेत आठवडयातून दोन दिवस बसावे.

श्री.काशिनाथ कोकाटे :मा.आयुक्तांचा खुलासा ऐकूण घ्यावा.त्यांनी सर्वांचे ऐकूण घेतले.

श्री.संजय जगताप :मा.आयुक्तांनी महानगरपालिकेत व झोपडपट्टयांना भेट दयावी.

याच वेळी स.सदस्य श्री.संजय जगताप हे मा.महापौर डायस समोर मोठमोठयाने बोलतात.

मा.महापौर :मा.आयुक्त खुलासा करीत आहे त्यांचा खुलासा पुर्ण झालेला नाही सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे व स.सदस्य श्री.संजय जगताप यांनी शांततेने आपआपल्या जागेवरून बोलावे आपण शांत बसा.

श्री.संजय जगताप :आपण शांत बसावे आम्हाला शांत करू नये.

मा.महापौर :सभागृहात स.सदस्यांनी असे बोलणे बरोबर नाही ही बोलण्याची पध्दत नाही. हा माझाच नव्हे तर सभागृहाचा अवमान आहे.

याच वेळी स.सदस्य श्री.संजय जगताप यांचे सभासदत्व रद्य करावे अशी मोठमोठयाने काही पालिका सदस्य मागणी करतात स.सदस्य श्री.जगताप व मा.महापौर यांच्यात आपसात संवाद चालू असतो.

मा.महापौर :स.सदस्य श्री.संजय जगताप यांनी डायस समोर येवून मोठमोठयाने बोलून महापौरांना अपमानीत केले यामूळे माझाच नव्हे तर या सभागृहाचा अवमान केला पिठासीन अधिकारी यांचे सोबत असे वर्तन करणे योग्य नाही. त्यामुळे त्यांचे एक दिवसासाठी सभासदत्व रद्य करण्यात येते.

श्री.संजय शिरसाट :नवीन आयुक्त श्री.बंड साहेब यांनी येथे आल्यापासून अतिक्रमण हटाव मोहिम सुरू करून एक चांगल्या कामाला सुरूवात केली. त्यांचे अभिनंदन करावे तसा प्रस्ताव मी आपणाकडे देत आहे.तो मान्य करावा.

**विषय क्र.२८० :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मा.आयुक्त श्री.दिलीप बंड यांनी औरंगाबाद मनपा आयुक्त पदाचा पदभार घेतल्यापासून या शहराचा सर्वागिंण विकास करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत असून शहरातील सर्व रस्ते,अनाधिकृत बांधकामा संदर्भात त्यांनी केलेले कार्य उल्लेखनिय असल्यामूळे, मा.आयुक्तांचे अभिनंदन करण्याचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपूढे मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.संजय शिरसाट,डॉ.भागवत कराड,श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय,श्री.काशिनाथ कोकाटे

अनुमोदक : श्री.संतोष जेजुरकर,श्री.गजानन बारवाल,सौ.लता दलाल,श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर, श्री.त्र्यंबक तुपे,श्री.रशिद खान मामु, श्री.मो.जावेद कुरैशी

**संवाद :**

डॉ.भागवत कराड :या शहराच्या विकासासाठी चांगले काम नवीन आयुक्त यांनी सुरू केले या ठरावास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर :जो आयुक्ताच्या अभिनंदनाचा ठराव मांडला त्यास मंजूरी देण्यात येते. स.स.श्री.संजय जगताप यांचे एक दिवसासाठी सभासदत्व रद्य केलेले आहे त्यांनी कृपया सभागृहाच्या बाहेर जावे.तोपर्यत सभेचे कामकाज सुरू होणार नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,मा.आयुक्त श्री.दिलीप बंड यांनी औरंगाबाद मनपा आयुक्त पदाचा पदभार घेतल्यापासून या शहराचा सर्वागिंण विकास करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत असून शहरातील सर्व रस्ते,अनाधिकृत बांधकामा संदर्भात त्यांनी केलेले कार्य उल्लेखनिय असल्यामूळे, त्यांचे अभिनंदन करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२८१ :**

मा.उच्च न्यायालयाचे आदेशान्वये रस्ता रूंदीकरणात बाधित होणाऱ्या सर्व मालमत्तांचे भूसंपादन करणे तसेच रेडीरेकनर नुसार सदरील बाधित होणाऱ्या मालमत्तांचे भूसंपादन करून

त्याचा मोबदला संबंधीत मालमत्ता धारकास अदा करण्याबाबतचे संपूर्ण अधिकार मा.आयुक्तांना प्रदान करण्यात यावे, करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपूढे मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष जेजुरकर,डॉ.भागवत कराड,श्री.संजय शिरसाट,श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय, श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर,श्री.गजानन बारवाल

अनुमोदक : श्री.त्र्यबंक तुपे,सौ.लता दलाल,सौ.रजनी जोशी,श्री.रशिद खान मामु,श्री.संतोष खेंडके, श्री.मो.जावेद कुरैशी

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.उच्च न्यायालयाचे आदेशान्वये रस्ता रूंदीकरणात बाधित होणाऱ्या सर्व मालमत्तांचे भूसंपादन करणे तसेच रेडीरेकनर नुसार सदरील बाधित होणाऱ्या मालमत्तांचे भूसंपादन करून त्याचा मोबदला संबंधीत मालमत्ता धारकास अदा करण्याबाबतचे संपूर्ण अधिकार मा.आयुक्तांना प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

याचवेळी स.सदस्य श्री.संजय जगताप सभागृहाच्या बाहेर निघून जातात.

मा.महापौर :मा.आयुक्तांनी उर्वरीत खुलासा करावा.

मा.आयुक्त :जास्तीत जास्त कामे करायची आहे आणि त्यासाठी निधी कसा आणता येईल यासाठी सर्वांनी मिळून निर्णय घेतले पाहिजे. त्यातून विकास कामे कशी करता येतील.या बाबत खुलासा देत होतो. चांगली कामे कमी खर्चात कशी होतील याकडे सुध्दा दिले गेले तर महापालिकेचा फायदा होईल प्रत्येक काम ठेकेदाराच्या मार्फतच न करता महापालिकेकडे जे.ई व इतर वर्करर्स आहेत.त्यांचेकडून करून घेतल्यास हा खर्च ५० टक्के पर्यत आणू शकतो. कार्य.अभियंता व त्यांचे हाताखालील कर्मचाऱ्याची प्रवृत्ती व्हायला पाहिजे. प्रत्येक विभागाकडून प्रत्येक वार्डात दोन कामे महापालिकेच्या मार्फत केली तर बराचसा खर्च कमी होईल. विकास कामे थांबविली अशा सुचना प्रशासनाने दिलेल्या नाही.जे काम अत्यावश्यक आहे व बजेटमधील तरतूद बघून त्या कामाचे प्लॅनींग करून करावे या वर्षी स्पील ओव्हर कमी केले नाही तर पुढील वर्षी आणखी वाढेल.ते कमी करण्याचा प्लॅनींग करतो आहे. धार्मीक स्थळाच्या बाबतीत मुद्या सदस्यांनी उपस्थित केला होता धर्म स्थळाची यादी केलेली आहे त्यात काही तृटी राहिलेल्या आहेत.जे २०० फुट बाहेर आहे.तरी ते रस्त्यामध्ये दाखवलेले आहे. संबधीत अधिकारी आता येथे नाही सुरूवातीला मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणेच सर्वे केला होता.जे अधिकृत प्रार्थना स्थळे आहे त्याची यादी तयार केली आहे. नंतर यावर एकत्र बसून चर्चा केली होती हे सर्वच करायला गेलो तरच संपूर्ण शहर अंगावर येईल.पुष्कळ ठिकाणी खुल्या जागेवरील उद्याने,धार्मीक स्थळे झालेली आहे तर प्राधान्याने जे रस्त्यावर आलेले धार्मीक स्थळे आहेत तेवढेच घ्यावयाचे ठरविले आहे. जर यादीमधे चुकून दुसरे नाव आले असेल तर ते तपासणीमधे नक्कीच कमी केले जाईल,आताच एक स.सदस्या यांनी प्रश्न उपस्थित केला पाण्याचे कनेक्शन दिले जात नाही किंवा तोडले जातात आज शहराचा विचार केला असता जेवढे पाणी येते त्यात अनाधिकृत नळांची संख्या जास्त आहे. त्यामुळे अनाधिकृत नळ कनेक्शन दंड करून रेग्युलाईज करण्यात यावे व रेग्युलाईज होत नसेल तर नळ कनेक्शन तोडण्यात यावे. मुख्य जलवाहिनीवरील अनाधिकृत नळ कनेक्शन असेल ते तोडावयास पाहिजे. अशा सुचना दिलेल्या आहेत.

श्री.संतोष खेंडके :तीन टप्प्यात गुंठेवारीची रक्कम भरणा करून रेग्युलाईज करावे.

मा.आयुक्त :सन २००१ पुर्वीचे घराचे बांधकाम झाले असेल तर ते गुंठेवारीत रेग्यूलर करता येईल. त्यासाठी त्या त्या भागातील लोकांची गुठेंवारीत येण्यासाठी मानसिकता बदलली पाहिजे. ओपनस्पेसवर जर कुणी अतिक्रमण केले असेल तर ते काढण्या बाबत वार्ड अधिकारी व त्यांचेकडे दिलेल्या कर्मचारी पथकाने कार्यवाही करावी.जे कर्मचारी दिलेल्या आदेशानुसार कार्यरत झाले नाही तर शिस्तभंगाची कार्यवाही होईल.शहरात स्वच्छता राहण्यासाठी वार्ड अधिकारी यांना सुचना दिलेल्या आहे.काही कामे महापालिकेच्या वतीने केल्यास फायदा होईल गेल्या वर्षी ३-४ कामे डिफर पेमेन्टवर करण्यास दिली त्या कामाचे ७० टक्के पेमेंन्ट अदा करावे लागेल. नागरीकांना ज्या बेसीक सुविधा पाहिजे ती अत्यावश्यक कामे केली जातील ती बंद केलेली किंवा थांबविलेली नाही. शहरात स्वच्छतेला मी प्रथम प्राध्यान्य दिलेले आहे प्रत्येक अधिकाऱ्यांना एक एक वॉर्ड स्वच्छतेवर नियंत्रण ठेवण्यासाठी दिलेला आहे. त्यांनी सकाळी ५ वाजता वॉर्डामधे जावून स्वच्छतेवर जातीने लक्ष दयावयाचे आहे. महापालिकेकडे स्वच्छतेसाठी पायाभुत सोई सुविधा व साधनांची कमतरता ते मागविण्याची तयारी चालू आहे कचरा कमी करण्यासाठी प्रत्येकाच्या घरी दोन डस्बीन देण्यात येईल एका डस्बीनमधे ओला कचरा व दुसऱ्या डस्बीनमधे कोरडा कचरा टाकण्यासाठी नागरीकांना देण्यात येईल. तो कचरा घंटागाडीमधे टाकण्यात येईल जेणे करून शहर स्वच्छ राहण्यास मदत होईल. सदरची योजना सदस्य निधीमधून करण्यात येईल ती सर्व सदस्यांनी मंजूर करावी. गेल्या वेळेस तिन चार कामे डिफर पेंमेटवर केले त्यांना पेमेंट दयावे लागेल.

श्री.सतीष कटकटे : पैठण गेट पासून पुढील रस्त्याचे अतिक्रमण काढले नाही.जे अगोदर पाडले त्या रस्त्याचे काम अगोदर हाती घ्यावे रस्त्यावर मस्जीद आहे वाद निर्माण झाला काम बंद केले असे होणार होते तर लोकांची घरे दुकाने काढली त्यांचा रोजीरोटी बंद केले.

मा.आयुक्त :ज्याठिकाणी अतिक्रमण काढलेले आहे त्या बाबतीत कार्यवाही लगेच होईल.

श्री.अ.रशिद खान :३००-४०० वर्षापासून मज्जीद,मंदीर डीपी रोडवर आहे काही थोर पुरूषाचे पुतळे आहे ते तर ५०-६० वर्षापूर्वीचेच असेल ते काढणार का त्यांचे नियोजन व्हावे.रस्ता रूंदीकरण कार्यवाही होत असतांना मार्कींग केली जाते मोबदला देणार का लोक विचारणा करतात टीडीआर एफएसआय घेतला नाही तर मोबदला देणार का त्यासाठी पुरेसा निधी आहे का?

मा.आयुक्त :ज्या ठिकाणी कार्यवाहीसाठी जातो तेथील जागा रस्त्यात येत असेल तर भुसपांदन करावीच लागेल त्यासाठी संबधीत व्यक्तीला पत्र देवून विनंती करतो आज १००रू.खर्चात होत असेल तर दोन वर्षानी आणखी रक्कम लागेल. अनेकांना जागेचा मोबदला म्हणून पैसे पाहिजे.ते दयायचे झाल्यास आताचा रेडीरेकणर मार्केट रेट प्रमाणे दयायला पाहिजे. ते अधिकार प्रशासनाला दयावे त्यानुसार प्रशासनाला कार्यवाही करता येईल.

श्री.मनमोहनसिंग ओबेरॉय : एकमताने मान्य.

मा.महापौर :रस्ता रूंदीकरण करण्यासाठी जागा भुसंपादनासाठी एफएसआय,टीडीआर किंवा जागेचा मोबदला देणे बाबतचे सर्वअधिकार मा.आयुक्त यांना देण्यात येते.

श्री.सलीम खान :मुंबई,पुणे नगर सारख्या रस्त्यात मस्जीद,मंदीर दर्गा असेल तर दोन्ही बाजूने रस्ता करून मार्ग काढलेला आहे. जसे दर्गाह असेल तर बुंर्जूग मंदीर

असेल तर पंडीत,मस्जीद असेल तर मुल्ला लोक पूर्वी झेडे लावून धार्मीक स्थळ स्थापन करीत असे. मा.न्यायालयीन ३८६५ च्या प्रकरण रस्त्यावरील धार्मीक स्थळे हटवावीत असे कूठेही उल्लेख नाही. असेल तर प्रशासनाने वाचून दाखववावे. मा.आयुक्त मा.महापौर यांनी बसून मार्ग काढावा.

श्री.विनायक पांडे :जेथे महापालिकेला खर्च येणार नाही व १०० टक्के अतिक्रमण आहे ते त्वरीत काढावे यापूर्वी कमी प्रमाणात रस्त्यावर धार्मीक स्थळे होती आता जास्तीची होवून जर डीपी रस्त्यावर असेल तर ते त्वरीत काढावयास पाहिजे या मनाचा मी आहे.

श्रीमती अजरा जबीन :माझे वार्डात ७०० लोकांनी गुंठेवारी रेग्युलर करण्यासाठी संचिका दाखल केली १३५ लोकांनी चलन घेतले ७०टक्के लोकांनी भरणा केले. उर्वरीत लोकांना चलन दोन वर्षापासून मागणी करूनही चलन दिले जात नाही त्यामुळे गुंठेवारी रेग्यूलर होत नाही.वार्डातील नागरीक गुठेंवारीची रक्कम भरण्यास तयार आहे. परंतु गुंठेवारी रेग्यूलर करून घेण्याची कार्यवाही महापालिकेकडून होत नसल्याने त्या त्या वार्डात विकास कामेही होत नाही. गुंठेवारी रेग्यूलर करण्यासाठी कार्यवाही व्हावी.नागरीक पैसे भरणा करण्यास तयार आहे.

मा.महापौर :गुंठेवारी भागात अनेक कामे थांबलेली आहे त्याकडे प्रशासनाने लक्ष देण्याची गरज आहे.तसेच सिडको भागातही विकासकामे करण्याकडे लक्ष देण्यात यावे.

मा.आयुक्त :हस्तांतरण झाल्यापासून विकास कामे होत नाही अशा प्रकारच्या तक्रारी लोकांच्या आहेत.या भागातील रस्त्याची दुरूस्तीचे, स्वच्छतेचे काम हाती घेण्यात येईल व एक उपआयुक्त यांची सिडकोसाठी लवकरच नियुक्ती करण्यात येईल.मा.उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे रस्त्यातिल धार्मीक स्थळे काढले परंतू कुणाला वाटत असेल तर त्यांनी मा.न्यायालयात अप्रोच व्हावे.

श्री.अ.रशिद खान :दर्गा,मस्जीद,मंदीर ४०० वर्षापूर्वीचे आहे थोर पुरूषाचे पुतळे ४०-५० वर्षापूर्वीचे आहे. पुतळे सोडून का सर्वे केला मस्जीद मंदीर हटविणार पुतळे का नाही.मंदीर मस्जीद दर्गाह पेक्षा पुतळे मोठे आहे का? ते ही हटवावे. आपण बसुन निर्णय घ्यावा.

डॉ.भागवत कराड :शासनाने त्यासाठी परवानगी दिलेली आहे.ते हटवू शकतो का?

याच वेळी मा.महापौर डायस समोर स.सदस्यांचे मोठमोठयाने बोलणे चालू असते.

श्री.संतोष खेंडके :सभा तहकूब करावी.

श्री.संजू रिडलॉन :सभा तहकूब करण्यात यावी.

श्री.विनायक पांडे :आताच अर्धातासा पूर्वी भारताला ऑलॉम्पीक कुस्ती स्पर्धेत ५६ वर्षानंतर दिल्लीच्या सुशीलने परत एकदा ब्रॉझपदक मिळालेले आहे. त्याचा अभिनंदनाचा ठराव घेण्यात यावा.

श्री.संतोष जेजूरकर :यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर :आताच सुचवल्याप्रमाणे संबधीत खेळाळूचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करण्यात येते.

श्री.गजानन बारवाल :सर्व विषय मंजूर करावे.

डॉ.भागवत कराड :चिकलठाणा कडे जाणारा रस्ता तसेच कैलासनगर लक्ष्मणचावडी ते एमजीएम हॉस्पीटल पर्यतचा तसेच पानदरीबा कडे जाणारा रस्ता रूंदीकरण करणे महत्वाचे आहे.

**विषय क्र.२७१ :**

दिनांक १९.०६.२००८,(का.प.क्र.११),१९.०६.२००८,(का.प.क्र.१२)१९.०७.२००८, २९.०७.२००८, (का.प.क्र.१३)रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

मा.महापौर :मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक १९.०६.२००८,(का.प.क्र.११),१९.०६.२००८,(का.प.क्र.१२)१९.०७.२००८,२९.०७.२००८, (का.प.क्र.१३) रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणेस मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र.२७२ :**

महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग यांचे आदेश क्र.एफसीओ-१२०७/५१८/ प्र.क्र.१०६/ ०७/नवि-१४, मंत्रालय, मुंबई-३२ दि.७.७.२००७ नुसार श्री.सोमनाथ शेटे, मुख्याधिकारी,नगर परिषद,चिखली,जि.बुलढाणा यांची उपआयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद या पदावर प्रथम एक वर्ष किंवा शासनाच्या पुढील आदेशापर्यंत बदलीने नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्याप्रमाणे श्री.सोमनाथ शेटे,यांना उपआयुक्त या पदावर दि.१२/७/२००७ पासून मध्यान्हानंतर रूजू करून घेण्यात आले. दि.१०/१०/२००७ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.९६४/१ नुसार दि.१२/७/२००७ पासून एक वर्षाच्या बदलीने नियुक्त करण्याबाबत ठराव मंजूर केलेला आहे. सदर नियुक्तीचा कालावधी दि.११/७/२००८ रोजी संपत असल्यामुळे व महापालिकेला त्यांच्या सेवेची आवश्यकता असल्याने त्यांचा नियुक्तीचा कालावधी दि.१२/७/२००८ पासून पुढील एक वर्षाकरीता प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्याबाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा.महापौर :हा विषय मंजूर करण्यात येतो.

श्री.गजानन बारवाल :हा विषय मंजूर करू नये. संबधीत अधिकाऱ्यांना परत पाठवावे.

सौ.लता दलाल :परत पाठवावे नामंजूर करावा.आमचा विरोध आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :यांना कन्टीन्यू करावे.

याच वेळी मा.महापौर डायस समोर मोठमोठयाने बोलणे चालू असते

श्रीमती जयश्री किवळेकर: मंजूर करावा.

मा.महापौर :सर्वांनी आपआपल्या जागेवरून बोलावे २७२ विषय मंजूर केलेला आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :मंजूरी देण्यात यावी.

श्री.गजानन बारवाल :संबधीत उपआयुक्त यांना परत पाठवावे. आम्ही मंजूर करण्यास स्पष्ट विरोध केलेला आहे मंजूरी देवू नये. या प्रस्तावावर मतदान घ्यावे.

श्री.संतोष जेजूरकर : मंजूर करू नये परत पाठवावे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :यात जातीवाद करू नये एक मंजूर करणार एकासाठी विरोध होतो हे योग्य नाही.

श्री.गजानन बारवाल :आम्ही जातीवाद करीत नाही. हा विषय मंजूर करण्यास आमचा विरोध आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :ज्यांचा विरोध असेल तो नोंदवून घ्यावा. मंजूरी देण्यात यावी.त्यांना सिडकोचे स्वतंत्र काम देण्यात यावे.

सौ.लता दलाल :कुणीही जातीवादाला रंग देवू नये. जे शासनाचे अधिकारी येथे येतात किती चांगले काम केले महापालिकेला किती फायदा करून दिला हे बघीतले जाते याचा विचार करून सभागृहात योग्य तो निर्णय होतो. जातीवाद केला जातो असे आरोप जेष्ठ सदस्यांनी करणे योग्य नाही.

श्री.सतीष कटकटे :सहा महिण्यापासून त्यांचेकडे कोणतेही काम नव्हते नवीन आयुक्त यांचे निदर्शनास आणून दिले त्यांना कामाची सवय नाही आता जकात वसुली

नाही उपआयुक्त या पदावरील अधिकारी आता ठेवण्याची गरज नाही परत पाठवावे.पदमपूरा भागात वाद निर्माण केले होते.

श्री.संतोष जेजूरकर :नियमानुसार ५०-५० टक्के प्रमाणे एक उपआयुक्त हे महापालिकेच्या अधिका-यामधून असायला पाहिजे. त्यानुसार कार्यवाही करावी हे मंजूर करू नये.त्यांचे जागेवर महापालिकांचा उपआयुक्त बसवा.

श्री.गजानन बारवाल :काम केले नाही म्हणून मा. आयुक्तांनी त्यांचे अधिकार काढून घेतले.

मा.महापौर : जे प्रतिनियुक्तीवर अधिकारी आलेले होते त्यांची नियुक्ती केलेली आहे. यांची प्रतिनियुक्ती न करण्याचे कारण काय?

श्री.सतीष कटकटे :महापालिकेतील सक्षम अधिका-यांची या पदावर नियुक्ती करावी.

श्री.गजानन बारवाल :कुणाला ठेवायचे कुणाला परत पाठवायचे हा सभागृहाचा अधिकार आहे.

श्री.काशिनाथ कोकाटे :ठराव मंजूर केलेला आहे परत निर्णय बदलू नये.

मा.महापौर :हा विषय मंजूर केलेला आहे. यावर पून्हा चर्चा करता येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.सोमनाथ शेटे,यांना उपआयुक्त या पदावर दि.१२/७/२००८ पासून पुढील एक वर्षाकरीता प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७३ :**

आयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजना ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून दि.१ एप्रिल १९९८ पासुन दैनंदिन देखभाल व दुरूस्ती करीता महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आली आहे. हस्तांतरणाच्या वेळेस योजनेवर कार्यरत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे तांत्रिक कर्मचारी, ज्यामध्ये उपअभियंता (स्थापत्य),उपअभियंता (यांत्रिकी),शाखा अभियंता (स्थापत्य,विद्युत व यांत्रिकी) असे एकुण आठ कर्मचारी प्रतिनियुक्तीवर महानगरपालिके अंतर्गत पाणी पुरवठा विभागामध्ये घेण्यात आले होते. उपरोक्त आठ कर्मचारी सन-१९९८ पासून महानगरपालिकेमध्ये कार्यरत होते. त्यापैकी उपअभियंता (स्थापत्य व यांत्रिकी) व तसेच एक शाखा अभियंता हे नियत वयोमानानूसार सेवानिवृत्त झाले. उर्वरीत तीन अभियंतांना त्यांची बदली झाल्यामुळे महाराष्ट्र जिवन प्राधिकरणामध्ये परत पाठविण्यात आलेले आहे. तसेच श्री.डी.आर.गवई शाखा अभियंता (यांत्रिकी) यांची पदोन्नती झाल्यामुळे त्यांना दिनांक ३१.०५.०७ रोजी महानगरपालिकेच्या सेवेतून कार्यमुक्त करण्यात आले आहे.

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग यांचे पत्र क्र.५३३ दिनांक ३१.०५.०३ नुसार त्यावेळेस शाखा अभियंताची गरज असल्यामुळे तशी मागणी मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,औरंगाबाद यांना करण्यात आली होती. त्यानुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाकडून श्री.के.पी.धांडे (शाखा अभियंता) यांचे प्रतिनियूक्तीवर महानगरपालिकेत आदेश काढण्यात आले. आदेशानुसार श्री.के.पी.धांडे (शाखा अभियंता) हे दिनांक ०४.०७.२००३ रोजी महानगरपालिकेत रूजु झाले व सद्यस्थितीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे प्रतिनियुक्तीवर ते एकटेच कार्यरत आहेत. त्यांना मा.सर्वसाधारण सभेने दिनांक ०७.०७.२००८ पर्यंत प्रतिनियुक्ती कालावधीसाठी मुदतवाढ दिलेली आहे.

सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाअंतर्गत, जायकवाडी स्थापत्य उपविभागा मध्ये श्री.के.पी.धांडे शाखा अभियंता व महानगरपालिकेचे एक शाखा अभियंता तसेच एक दुय्यम आवेक्षक असे तीन तांत्रिक कर्मचारीच कार्यरत असून त्यांच्या मार्फतच जायकवाडी उद्‌भव ते शहरापर्यंत साधारणतः ४५ कि.मी.लांबीच्या दोन अशुध्द उध्दरण वाहिन्या, दोन जलशुध्दीकरण केंद्र, दोन शुध्द उध्दरण व गुरूत्व वाहिन्या,संतुलीत जलकुंभ आदी उपांगे अंतर्भुत असलेल्या दोन मुख्य पाणी पुरवठा योजनांची देखभाल दुरूस्ती,संचलन,प्रस्तावीत औरंगाबाद शहर समांतर पाणीपुरवठा योजने संदर्भातील विविध कामे,प्रस्तावीत औरंगाबाद शहर पुर्नरचीत वितरण व्यवस्थेची कामे

शासनाकडे पाणीपुरवठया संबंधी सादर करावयाचे विविध प्रस्ताव, पाणी पुरवठा व उर्जा लेखापरिक्षण तसेच जलवाहिनी फुटणे वा इतर आकस्मिक उद्‌भवणारी आपत्कालीन स्थिती हाताळून शहराचा पाणी पुरवठा सुरक्षीत व सुरळीत ठेवणे इत्यादी कामे करण्यात येतात.

उपरोक्त प्रमाणे कामाचे मोठे स्वरूप पाहता,श्री.के.पी.धांडे शाखा अभियंता,(स्थापत्य) यांना एक वर्षासाठी म्हणजे ०७.०७.२००९ पर्यंत प्रतिनियुक्ती कालावधीसाठी मुदतवाढ देणे योग्य राहील.

करीता श्री.के.पी.धांडे शाखा अभियंता (स्थापत्य) यांना एक वर्षासाठी म्हणजे ०७.०७.२००९ पर्यंत मुदतवाढ देणे बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर : हा विषय मंजूर करण्यात येतो

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,श्री.के.पी.धांडे शाखा अभियंता (स्थापत्य) यांना एक वर्षासाठी दि.७.७.२००९ पर्यंतच्या प्रितिनियुक्तीस मुदतवाढ देणेस मंजुरी देण्यांत येते,वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रशासकीय प्रस्ताव**

**विषय क्र.२७४ :**

आयुक्त,महानगरपालिका प्रस्ताव सादर करीत आहेत की, महाराष्ट्र शासन पत्र क्र./संकीर्ण/२००८/ औषध-जकात /प्र.क्र.-२५१/नवि-३४, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक १ जुलै २००८ अन्वये शासनाने जिवन रक्षक औषधीवर काही महानगरपालिकेत जकात कराची आकारणी करण्यात येते. त्यामुळे अशा औषधांच्या किंमती वाढू नयेत आणि सामान्य जनांचे आरोग्यमान सुधारावे व सर्वसामान्य वर्गाला औषधी खरेदी करणे शक्य व्हावे अशी शासनाची भूमिका आहे.

वरीलप्रमाणे शासनाची भुमिका लक्षात घेता, औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे जीवनरक्षक औषधी या मालावर जकात दर अनुसुची ओ मधील अ.क्र.१२ (ब) प्रमाणे जकात दर मालाच्या किंमतीवर १% दराने जकात कराची आकारणी करण्यात येत आहे.

वरील शासनाच्या दिनांक १ जुलै २००८ रोजीच्या निर्देशानुसार जीवनरक्षक औषधी या आयातीत मालावर जकात कर माफी दिल्यास त्यापासून औरंगाबाद महानगरपालिकेचे वार्षीक सरासरी रक्कम रू.१.८० कोटी ते २.०० कोटीचे नुकसान होणार आहे.

वरीलप्रमाणे जीवनरक्षक औषधी या संपुर्ण आयात मालावर जकात कर माफी देण्याचे झाल्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम -१९४९ मधील तरतुदी नुसार वैधानिक कार्यपध्दतीचा अवलंब करून जकात नियम -१९८४ चे नियम ५ मध्ये दुरूस्ती करून जकात कर माफीच्या यादीमध्ये जीवनरक्षक औषधीचा समावेश करून सदरच्या आयात मालावर जकात कर माफी देणे बाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासन पत्र क्र./संकीर्ण/२००८/ औषध-जकात /प्र.क्र.-२५१/नवि-३४, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दिनांक १ जुलै २००८ रोजीच्या निर्देशानुसार जीवनरक्षक औषधी या आयातीत मालावर जकात कर माफी देणेसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम -१९४९ मधील तरतुदी नुसार वैधानिक कार्यपध्दतीचा अवलंब करून जकात नियम -१९८४ चे नियम ५ मध्ये दुरूस्ती करून जकात कर माफीच्या यादीमध्ये जीवनरक्षक औषधीचा समावेश करून सदरच्या आयात मालावर जकात कर माफी देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.२७५ :**

आयुक्त,यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शासनाचे सचिव,महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक २८/०५/२००८ रोजी पत्रान्वये कळविलेले आहे की, देशाच्या

आर्थिक व्यवस्थेता कृषी हा कणा असून राज्यातील बहुतांश लोक शेती व्यवसायावर अवलंबून आहे. शेती करणे किफायतशीर व्हावे यासाठी खताच्या किंमती कमी झाल्यास शेतकऱ्यांना दिलासा मिळेल अशी शासनाची भूमिका आहे. त्यादृष्टीने ज्या महानगरपालिका खतावर जकात कर आकारणी करीत आहेत त्यांनी या आर्थिक वर्षात सर्व प्रकारच्या खतावरील जकात कर माफीसाठी समुचित प्राधिकरणाची मान्यता घेवून अहवाल शासनाकडे पाठविण्यास कळविलेले आहे.

औरंगाबाद महानगरपालिका जकात कर अनुसूचित ओ मधील परिशिष्ट क्र.८५ (अ) मध्ये रासायनिक खते यावर प्रती टन रू.४/- याप्रमाणे जकात कराची आकारणी करण्यात येते. सन २००७-०८ या आर्थिक वर्षात खतावर रू.८.२० लाख एवढया रक्कमेचा जकात कराचा भरणा झालेला आहे. त्यामुळे औरंगाबाद महानगरपालिकेस सन २००८-०९ या आर्थिक वर्षात जकात माफीपासून रू.९.०० लाख आर्थिक नुकसान होणार आहे व हे नुकसान भरून काढण्यास दुसऱ्या वस्तुवर जकात दरवाढ करणे शक्य होणार नाही.

करीता शासनाच्या पत्रात नमूद केल्यानुसार खत या मालावर जकात माफी देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेणेस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ सादर.

मा.महापौर : विषय मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासनाचे सचिव,महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक २८/०५/२००८ रोजी पत्रान्वये कळविल्यानुसार खत या मालावर जकात माफी देण्यासंबंधी आवश्यक त्या कार्यपध्दतीचा अवलंब करून जकात कर माफी देणेस मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.२७६ :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा.स्थायी समिती सभा विषय क्र.४६३ दिनांक १९ व २४ मार्च २००८ अन्वये विशेष अर्थसंकल्पीय बैठकीत सन २००७-०८ चे सुधारीत व २००८-०९ चे मुळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता देऊन मा.सर्वसाधारण सभेच्या मंजुरी करीता सादर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर अर्थसंकल्पीय पुस्तीकेत वान्सपती उद्यान या लेखाशिर्षका अंतर्गत पान क्र.डब्ल्यू ३२ अ.क्र.१ नुसार सिडको एन-८ येथे बोटॅनिकल गार्डन विकसीत करणे करीता रक्कम रू.१७५०० (हजार) अशी स्पील ओव्हर मध्ये तरतुद करण्यात आलेली आहे. जी की योग्य आहे. तथापी मा.सर्वसाधारण सभेसमोर सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय पुस्तीकेत उपरोक्त कामास्तव पान क्र.डब्ल्यु ४८ अ.क्र.१ नुसार १७५ (हजार) अशी तरतुद ठेवण्यात आलेली आहे. सदरील ठिकाणी नजर चुकीने १७५०० (हजार) ऐवजी १७५ (हजार) अशी तरतुदीची नोंद घेण्यात आलेली आहे.

त्यानुसार उपरोक्त कामास्तव वनस्पती उद्यान या लेखाशिर्षका अंतर्गत पान क्र.डब्ल्यु ४८ अ.क्र.१ नुसार १७५ (हजार) ऐवजी १७५०० (हजार) अशी दुरूस्ती करणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

मा.महापौर : विषय मंजूर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थसंकल्पामध्ये सिडको एन-८ येथे बोटॅनिकल गार्डन विकसीत करणे करीता वनस्पती उद्यान या लेखाशिर्षका अंतर्गत पान क्र.डब्ल्यु ४८ अ.क्र.१ नुसार १७५ (हजार) ऐवजी १७५०० (हजार) अशी दुरुस्ती करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.२७७ :</u>**

आयुक्त,यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेचे इमारत उपविधी व विकास नियंत्रण नियम बघीतले असता त्यामध्ये अनेक ठिकाणी सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. या बाबीचा विचार करता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मंजुर केलेले व अस्तित्वात

असलेले विकास नियंत्रण नियम जसेच्या तसे औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये लागू करणे हे शहराच्या दृष्टीकोणातून व शहराचा पध्दतशीर विकास होण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक आहे.

तसेच शहरामध्ये रस्त्यासाठी जागा भूसंपादन करण्याची आवश्यकता आहे. व या भूसंपादनासाठी कोटयावधीची रक्कम मोबदला म्हणून जमीन मालकास द्यावे लागतील. शहरामध्ये चटई क्षेत्र निर्देशांक (F.S.I)/ हस्तांतरणीय विकास हक्क (T.D.R) देण्याचे नियम मंजुर झालेले आहेत व शासनाने त्यास मान्यता दिलेली आहे. त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे करणेसाठी सर्वांनीच पुढाकार घेवून सहकार्य करण्याची आवश्यकता आहे. जेवढे क्षेत्र भूसंपादनाखाली येणार असेल तेवढया क्षेत्राचे नियमानुसार देय चटई क्षेत्र निर्देशांक (F.S.I) जमीन मालकास मोबदला म्हणून मिळू शकतो व त्याची अंमलबजावणी करण्यास महानगरपालिकेची हरकत नसावी. हस्तांतरणीय विकास हक्क (T.D.R) देण्यासाठी प्रति १००० चौरस मीटर ला रू.१०,०००/- असावे व ही रक्कम संबंधितांनी महानगरपालिकेकडे भरल्यानंतर तसेच इतर आवश्यक बाबींची पुर्तता केल्यानंतर त्यांना रितसर हस्तांतरणीय विकास हक्क (T.D.R) देण्यात येईल. तसेच रस्ते विकसित करण्यासाठी बराचसा निधी लागणार आहे. एखादा विकासक त्यांच्या जागेवर हस्तांतरणीय विकास हक्क (T.D.R) वापरणार असेल, त्यावेळी प्रति चौ.मी.ला रूपये ६००/- याप्रमाणे विशेष विकास निधी लावणे गरजेचे राहील. कारण या उत्पन्नातून महानगरपालिकेस रस्ते विकास व इतर नागरी सुविधा देता येतील.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे विकास नियंत्रण नियम, आहे त्या परिस्थितीत औरंगाबाद शहरामध्ये लावण्यासाठी मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. तसेच या व्यतिरीक्त औरंगाबाद महानगरपालिकेच्या इमारत उपविधी व विकास नियंत्रण नियमावलीत इतर तरतुदीचाही समावेश राहील. या प्रस्तावास महानगरपालिकेने मान्यता दिल्यानंतर आयुक्तांनी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमाचे कलम ३७ प्रमाणे हरकती/सूचना मागविण्यात येऊन व त्यानंतर प्रस्ताव तयार करून तो शासनाकडे मान्यतेसाठी पाठविण्यास महानगरपालिका मान्यता देत आहे. शासनाची मान्यता मिळाल्यानंतर त्याची अंमलबजावणी शहरासाठी करण्यात येईल.

वरील प्रमाणे प्रस्ताव सभेच्या मान्यतेसाठी व विचारार्थ सादर.

**संवाद :**

| | |
|---|---|
| श्री.अ.रशिद खान | :या प्रस्तावाविषयी सविस्तर माहिती घेण्यात यावी. |
| श्री.सतीष कटकटे | :२७२ विषयाच्या संदर्भात बोलतो मुख्याधिकारी संवर्गातील अधिकारी उपआयुक्त पदावर काम करू शकतात का नियमाने बरोबर आहे का ? |
| श्री.संतोष जेजूरकर | :२७२ या विषयावर मतदार घ्यावे.आज तो मंजूर करू नये आमचा विरोध आहे.पुढील बैठकीत सविस्तर ठेवावा. |
| मा.महापौर | :प्रशासनाने २७७ या प्रस्तावाविषयी माहिती दयावी. |
| श्री.संतोष खेंडके | :आम्ही सर्व सदस्य बाहेर जातो जो आपल्याला निर्णय घ्यायला तो घ्यावा. |
| मा.आयुक्त | :हा महत्वाचा विषय असून जागेचा मोबदला म्हणून संबधीत मालकांना टीडीआर किंवा एफएसआय देणे आवश्यक आहे मोबदला म्हणून पैसे देणे एवढी मोठी रक्कम महापालिकेकडे नाही.टीडीआर देतांना संबधीत मुळ मालक अर्ज देवून अपील करतील त्यास जेंव्हा आपण लोड केले जाईल त्यावेळी चार्जेस लावले जाते. पिपंरी चिंचवड महापालिकेमध्ये हे होते. हा एक प्रकारे महापालिकेला उत्पन्न होते. यात प्रति चौ.मी.साठी ६०० रूपये दिलेले आहे.जास्त वाटत असेल तर कमी करावे.आज मान्यता दिली तर उदयापासून प्रशासन कार्यवाही सुरू करेल. |
| श्री.संतोष जेजूकर | :सभागृहात कोरम नाही. यापुढे कोणताही विषय मंजूर करू नये नसता मा. न्यायालयात चॉलेंज करू. |
| श्री.अ.रशिद खान | :६००रू जास्त होतात ४०० करावे.जुन्या शहरासाठी देणार नाही का? |

याच वेळी काही स.पालीका सदस्य सभागृहाच्या बाहेर जातात.

मा.आयुक्त :जुन्या शहरात एफएसआय दोन मिळत असेल तर टीडीआर पण दोन मिळतील.किंवा एफएसआय दोन मिळतील किंवा मार्केट रेट प्रमाणे मोबदला मिळेल.

याच वेळी पुन्हा बाहेर गेलेले काही स.पालीका सदस्य सभागृहात येतात.

श्री.संजय सिरसाट : नियमानुसार कोरम नसेल तर सभेचे कामकाज करता येत नाही.सभा चालविणे नियमबाहय आहे.जे प्रशासन स्टेटमेंन्ट करीत आहे ते चुकीचे होवू शकते.

श्री.काशिनाथ कोकाटे :सर्व विषय मंजूर झालेले आहे.

श्री.संजय सिरसाट :जेंव्हा केंव्हा काय झाले तो भाग नाही आता कामकाज करता येत नाही.

मा.महापौर :ठराव मंजूर केला तेंव्हा सभागृहात संपूर्णतः कोरम होते. या विषयात ४००रू प्रति.मी. ला विशेष विकास निधी लावणेच्या दुरूस्तीसह मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेचे इमारत उपविधी व विकास नियंत्रण नियमामध्ये सुधारणा करण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मंजुर केलेले व अस्तित्वात असलेले विकास नियंत्रण नियमावलीत साम्य असल्याने व त्याच्या मांडणीत सुसुत्रता व व्यवस्थितपणा जास्त असल्याने ती नियमावली पायाभूत समजून प्रारूप तयार करून औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये लागु करणेस त्यात पिंप्री चिंचवड महानगरपालिकामध्ये लागु असलेल्या व औरंगाबाद शहरासाठी अनावश्यक असलेल्या तरतूदी वगळण्यात यावे. याऊलट ज्या तरतूदी औरंगाबाद शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीत आहेत.व पिंप्री चिंचवड महानगरपालिकेच्या नियमावलीत नाहीत ते ठेवण्यात यावे. तसेच शहरामध्ये रस्त्यासाठी जागा भूसंपादन करण्याची आवश्यकता असल्यामूळे व या भूसंपादनासाठी कोटयावधीची रक्कम मोबदला म्हणून जमीन मालकास द्यावे लागतील आणि शहरामध्ये चटई क्षेत्र निर्देशांक (F.S.I)/ हस्तांतरणीय विकास हक्क (T.D.R) देण्याचे नियम मंजुर झालेले आहेत व शासनाने त्यास मान्यता दिलेली असल्यामूळे,एखादा विकासक त्यांच्या जागेवर हस्तांतरणीय विकास हक्क (T.D.R) वापरणार असेल, त्यावेळी प्रति चौ.मी.ला रू.४००/- याप्रमाणे विशेष विकास निधी लावणे या व वरील दुरूस्तीसह पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे विकास नियंत्रण नियम, औरंगाबाद शहरामध्ये लावण्यास व दोन्ही महानगरपालिकेच्या नियमावलीतील विकासाच्या दृष्टीने हितावह व अंमलबजावणी दृष्टीने सुलभ, पारदर्शकता असणाऱ्या तरतुदींचा समावेश करून तसेच या व्यतिरीक्त औरंगाबाद महानगरपालिकेच्या इमारत उपविधी व विकास नियंत्रण नियमावलीत इतर तरतुदीचाही समावेश राहील यासह औरंगाबाद शहरासाठी प्रारूप विकास नियंत्रण नियमावली तयार करणेस व यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेर बदलाची कार्यवाही करणेसाठी अधिसुचना काढणे, हरकती व सूचना मागविणे, संबंधीतांना सुनावणी देऊन अंतिम प्रस्ताव शासनास पाठविणेची कार्यवाही करण्याचे अधिकार मा.आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद यांना प्रदान करण्यासही मान्यता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## स.सदस्यांचे प्रस्ताव

**विषय क्र.२७८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.७१ न्यायनगर येथील महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रास स्व.पुंडलिक राऊत यांचे नांव देण्यात यावे. याबाबत या भागातील नागरीकांची विशेष मागणी असल्यामुळे सदरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष खेंडके पाटील अनुमोदक :श्री.संतोष जेजुरकर, श्री.सतिष कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.७१ न्यायनगर येथील महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रास स्व.पुंडलिक राऊत यांचे नांव देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय

**विषय क्र. २७९ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेमध्ये ठराविक वेतनावर कार्यरत असलेले व त्यांना पुढील नेमणुक देणे बाबत मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे प्रकरण ३ अन्वये, त्यातील पोट कलम २ मधील तरतुदीच्या अधिन राहुन जे लिपीक पदाच्या अर्हताधारण करीत असल्याने व लिपीक पदास पात्र असल्यामुळे विमुक्त जाती भटक्या जमाती मधील 'ड' प्रवर्गातुन लिपीक पदावर रिक्त जागी वेतनश्रेणी रूपये ३०५०-१२५-४५९० मध्ये कायम नेमणुक देण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.संतोष सुधाकर जेजुरकर

अनुमोदक : श्री.अशरफ मोतीवाला,श्री.भागवत कराड,सौ.दलाल लता श्रीनिवास
श्री.अब्दुल रशिद खान (मामू)

**संवाद :**

डॉ.भागवत कराड : श्री.नितीन सांगळे यांची नेमणूक करावी.

मा.महापौर : दुरूस्तीसह मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका आस्थापनावर ठराविक वेतनावर कार्यरत असलेले व त्यांना पूढील नेमणूक देणे बाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ३ अन्वये, त्यातील पोट कलम २ मधील तरतूदीच्या अधिन राहून लिपीक पदाच्या अर्हताधारण असलेले व लिपीक पदास पात्र असल्यामूळे, विमुक्त जाती भटक्या जमाती मधील 'ड' प्रवर्गातुन लिपीक पदावर रिक्त जागी वेतनश्रेणी रूपये ३०५०-१२५-४५९० मध्ये कायम नेमणुक देण्यास व लिपीक पदावर श्री.नितीन सांगळे यांची नेमणूक करण्याच्या दुरूस्तीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र.२८२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मो.सुराणानगर भागात सेव्हन हिल परिसराच्या उंच भागावरील पावसाळ्यात पावसाचे सांडपाणी मोठ्या प्रमाणात सुराणानगर या सखल भागात वाहत येते. पावसाचे सांडपाणी सुराणानगर भागातील नागरीकांच्या घरात शिरून जिवीत व आर्थिक हाणी होण्याची दाट शक्यता असल्याने सदर भागाची मा.महापौर,स.नगर सेवक यांच्यासह संयुक्त स्थळ पाहणी झाली असता सदर ठिकाणी पावसाचे सांडपाणी वाहून जाण्यासाठी रस्त्यालगत आर.सी.सी. गटार बांधणे अनिवार्य असल्याचे निदर्शनास आल्याने वार्ड क्र.५०,मो.सुराणानगर भागात रस्त्यालगत आर.सी.सी.सरफेस गटार बांधणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बा.खात्याच्या सन २००६-०७ च्या दरसूचीनुसार तयार करण्यात आले असून अ.प.रक्कम रू.२९,९०,०००/- होत आहे. सदरील काम वर्ष २००८-०९ अर्थसंकल्पमधील पान क्र.डब्ल्यु-४०,अ.क्र.१९ वरील ३० लक्ष तरतूद शहरी भागात खुल्या गटारी बांधणे या लेखाशिर्ष मधून प्रस्तावित आहे. रक्कम रू.२९,९०,०००/- चे अंदाजपत्रक मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५०,मो.सुराणानगर भागात रस्त्यालगत आर.सी.सी. सरफेस गटार बांधणेच्या कामाचे रक्कम रू.२९,९०,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.२८३ :</u>**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद हे प्रस्ताव सादर करीत आहे की, थकीत मालमत्ता व पाणीपट्टी करांवर विलंब शुल्क आकारणी करणे बाबत मा.सर्वसाधारण सभेने दिनांक १६.०२.२००८ रोजी ठराव (विषय क्र.१३०) पारित केलेला आहे. त्यानुसार दिनांक ०१.०४.२००८ पासून १२ टक्के विलंब शुल्क आकारण्यात येत आहे. तथापी सर्वसामान्य मालमत्ता धारकास थकीत रकमेचा कर भरणा करणेस संधी मिळावी म्हणून मा.महापौर यांनी त्यांच्या दालनात बैठक घेवून अभय योजना लागू करण्याबाबत दि.१४.०८.२००८ च्या पत्रान्वये आदेशीत केले आहे. त्या अनुषंगाने विलंब शुल्काची आकारणी दि.०१.०४.२००८ पासून न करता दि.०१.०९.२००८ पासून करणे बाबत प्रस्ताव सादर करणेत येत आहे. यापूर्वी दिनांक ०१.०४.२००८ पासून वसूल करणेत आलेला विलंब शुल्क पूढील वर्षा करीताच्या मालमत्ता/पाणीपट्टी करात समायोजीत करणेत येईल.

करिता सदरील प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपूढे मान्यतेस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, थकीत मालमत्ता व पाणीपट्टी करांवर विलंब शुल्क आकारणी करणे बाबत मा.सर्वसाधारण सभेने दिनांक १६.०२.२००८ रोजी ठराव (विषय क्र.१३०) पारित केलेला असल्यामूळे, त्यानुसार दिनांक ०१.०४.२००८ पासून १२ टक्के विलंब शुल्क आकारण्यात येत असून सर्वसामान्य मालमत्ता धारकास थकीत रकमेचा कर भरणा करणेस संधी मिळावी म्हणून मा.महापौर यांनी त्यांच्या दालनात बैठक घेवून अभय योजना लागू करण्याबाबत दि.१४.०८.२००८ च्या पत्रान्वये आदेशीत केले असल्यामूळे, विलंब शुल्काची आकारणी दि.०१.०४.२००८ पासून न करता दि.०१.०९.२००८ पासून करणेस तसेच यापूर्वी दिनांक ०१.०४.२००८ पासून वसूल करणेत आलेला विलंब शुल्क पूढील वर्षा करीताच्या मालमत्ता/पाणीपट्टी करात समायोजीत करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## कार्यक्रम पत्रिका क्रमांक - (१४)
## दिनांक २०.०८.२००८ रोजी आयोजीत सर्वसाधारण सभेतील
## प्रश्नोत्तरे

**श्री.सुरेंद्रजितसिंग सबरवाल,स.पालिका सदस्य**

**प्रश्न क्र.२३ :**

०१. मनपा औरंगाबाद अंतर्गत उर्जा बचत दिवे बी.ओ.टी.(खाजगी) तत्वावर कोणास देण्यात आले? त्या ठेकेदाराचे (एजन्सी) संपूर्ण नांव,पत्ता,दुरध्वनी क्र.भ्रमण्ध्वनी,मोबाईल क्रमांक सविस्तर देणे? ब) शहरात एकुण किती ठेकेदारांना ठेके देण्यात आले? महानगरपालिका व सदरील ठेकेदारात कशाप्रकारे झाला ती सविस्तर माहिती. क) उर्जा बचत दिवे बसविल्यानंतर त्याचे दुरूस्तीचे (मेंटनन्स) काम कोण करतात. हे सविस्तर देणे? त्याचा मनपास काय फायदा होतो?

**कार्यकारी अभियंता (ज.नि.वि.इ.व उ)**

**उत्तर :**

अ) औरंगाबाद महानगरपालिकेत उर्जा बचत दिवे लावण्याचे काम बी.ओ.टी. तत्वावर मे.विनवॉक सिस्टीम,नाशिक यांना देण्यात आले आहे. पत्ता मे.विनवॉक सिस्टम्स इंक.Row House No.६, राधानगरी,त्रिंबक रोड, नाशिक ४२२००७ भ्रमणध्वनी क्रमांक ९३७१५३२८०८ हा आहे.

ब) शहरात एकुण सात ठेकेदारांना (१) मे.अल्सन इले.(५) मे.ब्राईट इले. (६) मे.ब्राईट इले.(७) मे.बानेश्वर इले. शहरातील पथदिवे देखभाल दुरूस्तीचे काम देण्यत आलेले आहे. सोबत कराराची प्रत जोडली आहे.

क) उर्जा बचत देखभाल दुरूस्तीचे काम मे.विनवॉक सिस्टीम,नाशिक हे करीत आहेत. त्याचा महानगरपालिकेस वीज बचतीचा फायदा होतो.

०२. मनपा अंतर्गत किती ठिकाणी सिग्नल बसविले? ब) प्रत्येक चौकात किती दिवे असविण्यात आले? जे सिग्नल (दिवे) बसविण्यात आले ते महानगरपालिकातर्फे बसविण्यात आले का. खाजगी तत्वावर (ठेकेदार) बसविण्यात आले? क) सदरील सिग्नल (दिवे) कोणत्या कंपनीचे बसविण्यात आले त्या कंपनीचे नाव व बील देणे?

अ) २७ ठिकाणी सिग्नल बसविण्यात आले.

ब) प्रत्येक चौकात ५० ते ५५ दिवे बसविण्यात आले आहे. सिग्नल महानगरपालिकेतर्फे मे.सि.एम.एस.मुंबई यांचे मार्फत बसविण्यात आले.

क) सदरील दिवे सी.एम.एस.कंपनीचे बसविण्यात आले आहेत. बसविण्यात आलेल्या सिग्नलचे देयक मनपातर्फे ८०% सदर एजन्सीला देण्यात आलेले आहे.

सदरील कामाचे कार्यादेश आपणास खालील अटी-शर्तीच्या अधीन राहुन देण्यात येत आहे.

**अटी-शर्ती**

१. शासनाचे पत्र क्र.जी.ई.एन-१०९८/१३५७/प्र.क्र.१६६-९८ नवि-२४ मुंबई दिनांक ०१.०२.१९९९ च्या पत्रानुसार व शासनाने तद्नंतर वेळोवेळी कळविल्यानुसार कंत्राटी कामाचा व कंत्राटी कामे पूर्ण करण्यासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या कामगारांचा विमा शासकीय विमा निधी किंवा शासकीय विमा निधीच्या अनुमतीने अन्य विमा कंपनीकडे प्रत्यक्षात काम सुरू करणे पूर्वी करणे आवश्यक आहे.

२. ठेकेदारास पथदिवे दुरूस्तीच्या कामासाठी आवश्यक असलेली साधन सामुग्री, अवजारे, शिडी (Aluminium adjustable ladder upto १२ mtr height) तसेच मनुष्यबळ

(योग्यता प्राप्त तांत्रिक कर्मचारी) अद्ययावत ठेवणे बंधनकारक राहील. तसेच विविध परवान्याचे नियमानुसार नुतणीकरण करून अद्ययावत ठेवणे.

३. आपलेकडे या कामाकरीता कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची शैक्षणिक/तांत्रिक अर्हताच्या पुराव्यासह यादी सादर करावी तसेच गुत्तेदाराने त्यांच्या कर्मचाऱ्यांना ओळखपत्र देणे आवश्यक आहे.

४. कोणत्याही पोलवर, पॅनलबोर्ड मध्ये,जंक्शन बॉक्स,सर्व्हीस वायर, केबल, विद्युत संच मांडणी इत्यादी ठिकाणी विद्युत प्रवाह येऊन गुत्तेदार यांचे कर्मचारी तसेच अन्य बाहय व्यक्तीस/प्राण्यास अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी (जिवीत व वित्तहानीस) कंत्राटदारावर राहील.

५. मा.विद्युत निरिक्षक,उद्योग उर्जा,कामगार विभाग, औरंगाबाद यांचे विद्युतीकरण चाचणी, स्थळ पाहणीचा अहवाल नियमानुसार सादर करणे बंधनकारक राहील.

६. देखभाल दुरूस्तीचे कामासाठी निविदा पुस्तकात नमुद केलेल्या अटी व शर्तीचे अधीन राहून काम करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

७. सदरील कामाकरीता निविदा पुस्ताकातील अटी व शर्ती मध्ये नमुद केलेल्या कंपन्यांचेच विद्युत साहित्य वापरणे बंधनकारक राहील. सार्वजनिक बांधकाम, (विद्युत विभाग) यांच्या कडील मान्यताप्राप्त कंपनीचे.

८. उक्त पथदिव्यांच्या कामांतर्गत विज पुरवठा मिटर्स जळालेले अथवा नादुरूस्त असल्यास त्याची संबंधीत कार्यालयाकडून दुरूस्ती किंवा बदलण्याची कार्यवाही कंत्राटदारास करावी लागेल. त्यासाठीचे आवश्यक कार्यालयीन शुल्क महानगरपालिका यांच्या वतीने भरण्यात येईल.

९. पथदिवे दुरूस्तीचे काम करतांना महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीच्या संबंधीत कार्यालयाशी संपर्क साधून संबंधीत भागाचा/संबंधीत लाईन सर्कीटचा विज पुरवठा बंद झाल्याची खात्री झाल्यानंतरच पथदिवे दुरूस्तीचे काम करणे व काम झाल्यानंतर संबंधीत कार्यालयास अवगत करणे तसेच याची लेखी नोंद ठेवणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील. याबाबतची सर्व जबाबदारी (अपघात वै.) कंत्राटदाराची राहील.

१०. पथदिव्यांच्या कामाकरीता खोदकाम करण्यापूर्वी आवश्यक इतर सर्व विभागाची परवानगी घेणे विद्युत ठेकेदारास बंधनकारक राहील. याकरीता महानगरपालिकेकडून कुठलाही आर्थिक खर्च करण्यात येणार नाही.

११. गुत्तेदारास शहरातील पथदिवे चालू बंद करणे हे विद्युत विभागाकडून दरमहा मिळणाऱ्या वेळापत्रकाप्रमाणे चालू-बंद करणे बंधनकारक आहे. पथदिवे वेळापत्रकाप्रमाणे चालू-ब्द न झाल्यास वाढीव येणारे युनिट महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीच्या दरानुसार चार्ज करून गुत्तेदाराकडून वसूल करण्यात येईल.

१२. शहरातील पथदिवे चालू बंद करतांना एखाद्या प्रभागातील दिवे तांत्रिक कारणाने बंद आढळल्यास तसे विद्युत विभागाकडे लेखी कळविण्यात यावे व महाराष्ट्र विज वितरण कंपनीच्या मदतीने विनाविलंब तात्काळ चालू करून घ्यावे.

१३. गुत्तेदाराने रोजचे कार्यवाहीबाबत दैनंदिन लेखी अहवाल विद्युत विभागाक्डे सादर करणे बंधनकारक आहे.

१४. नेमूण दिलेल्या भागापैकी एखाद्या किंवा एका पेक्षा जास्त भाग चालू न केल्यास व इतर बंद बाबत तक्रार प्राप्त झाल्यास नियमाप्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. ९५% पथदिवे नियमीतपणे चालू असणे बंधनकारक आहे.

१५. नेमून दिलेल्या भागातील बंद पथदिवे तीन दिवसाच्या आत दुरूस्त न झाल्यास ठेकेदारास प्रती दिवस प्रती पोल रूपये १०/- प्रमाणे दररोज दंड आकारण्यात येईल.

१६. गुत्तेदारास त्यांचे स्वतःचे ऑपरेटर,दुरध्वनी सुविधा,इतर आवश्यक असणाऱ्या सर्व सुविधांनी युक्त असे संपर्क कार्यालय स्थापन करणे आवश्यक आहे.

१७. कामाचा आदेश मिळताच पंधरा दिवसाचे आत ठेकेदाराने स्वखर्चाने त्यांना देण्यात आलेल्या भागातील सर्व पथदिव्यांचे सर्वेक्षण करून त्यानुसार पोल क्रमांक टाकुन अहवाल विहीत नमुन्यात कार्यकारी अभियंता (जलनिःसारण,विद्युत,इमारती व उद्याने) यांच्याकडे सादर करणे बंधनकारक राहील. विहीत नमुना सोबत जोडला आहे. सदर माहिती दिल्याशिवाय देयक देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

१८. औरंगाबाद शहर व सिडको परिसरात B.O.T तत्वावर एनर्जी सेव्हींग पथदिवे बसविण्यासाठी एजन्सीची नियुक्ती करण्यात आली असून, काम प्रगतीपथावर आहे. सदर कामांतर्गत आपल्या देखभाल दुरूस्तीच्या कार्यक्षेत्रात भविष्यात B.O.T तत्वावर पथदिवे लावले जाणार आहेत व सदर पथदिव्यांची देखभाल दुरूस्ती ही सदर एजन्सी करणार आहे. त्यामुळे ज्या तारखेपासून आपल्या देखभाल दुरूस्तीच्या पथदिव्यांची संख्या कमी होईल, त्या तारखेपासून कमी होणाऱ्या पथदिव्यांचे देयक आपणास अदा करण्यात येणार नाही.

१९. आपले कार्यक्षेत्रात स.नगर सेवक किंवा नागरीकांच्या तक्रारी प्राप्त झाल्यास त्यावर २४ तासांचे आत दुरूस्तीची कार्यवाही न झाल्यास हे दुरूस्तीचे काम उपलब्ध ठेकेदाराकडून Risk and cost basic वर करून घेण्यात येईल. या कामापोटी येणारा खर्च दंडासहीत आपले चालू देयकामधून वसूल करण्यात येईल. या प्रकरणी आपली कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकुन घेतल्या जाणार नाही.

२०. आपल्या कार्यक्षेत्रातील कमाबाबत वारंवार तक्रारी प्राप्त झाल्यास, उपलब्ध गुत्तेदारा मार्फत काम करून घेण्यात येईल. उपरोक्त अट क्र.१९ प्रमाणे दोन वेळेस Risk and cost basic वर काम करावे लागल्यास, मा.स्थायी समितीच्या मान्यतेनुसार सदरचे काम आपल्याकडून काढुन घेण्यात येऊन, आपले नांव काळया यादीत समाविष्ठ करण्यात येईल.

**श्री.सुरेंद्रजितसिंग सबरवाल,स.पालिका सदस्य**

**प्रश्न क्र.२४ :**

०१. महानगर जकात वसूल करणे सहकार एजन्सी देण्यात आले त्याचा करार कशा प्रकारे करण्यात आला? ब) जकात वसुल करण्याचा जो करार झाला तो किती (रक्कम) रूपयात करार झाला. व एकुण रक्कम किती? सहकार एजन्सीकडून साप्ताहिक,महिना किंवा रोज पैसे घेण्यात येते का? क) मनपाला जकातीपोटी महिना किती रक्कम मिळते व इतर मार्गाने किती रक्कम वसूल होते याची सविस्तर माहिती देणे?

**जकात अधिक्षक**

**उत्तर :**

अ) कराराची प्रत सोबत जोडण्यात येत आहे.

ब) ०१. सन २००७-०८ या वर्षात रू.१११.०६ कोटी मध्ये झाला. ०२.सन २००८-०९ करीता रू.१२३.०३ कोटी असून त्यानुसार सद्यस्थितीत मे.सहकार एजन्सीज कडून यावर्षी (दर मंगळवारी) साप्ताहीक हप्ता म्हणून र.रू.२,४१,८९,६२२/- प्रमाणे भरणा करण्यात येत आहे.

क) मनपाला जकातीपोटी महिण्यात चार साप्ताहिक हप्ते आल्यास येणारी र.रू.९,६७,५८,४८८/- आणि एखाद्या महिण्यात पाच साप्ताहिक हप्ते आल्यास येणारी र.रू.१२,०९,४८,११०/-

**श्री.सुरेंद्रजितसिंग सबरवाल,स.पालिका सदस्य**

**प्रश्न क्र.२५ :**

०२. तसेच मनपाचा एकुण खर्च (महिना) किती प्रत्येक विभागवार सविस्तर माहिती देणे जसे बीज पोटी किती रक्कम ०२) एकुण पगारापोटी किती रक्कम लागते ०३) स्टेशनरी खर्च किती?

याप्रमाणे मनपास येणारे एकुण उत्पन्न किती मिळते व एकुण खर्च किती होते ते सविस्तर उत्तर (माहिती) देण्यात यावी.

**जकात अधिक्षक**

**उत्तर :**

या विभागाशी संबंधीत नाही.

०१. जकात विभागाच्या विजपोटी खर्च रू.५,५५,९३०/- (१-३-०५ ते २०/७/०८ पर्यंत) हा करारनाम्याप्रमाणे जकात संकलन अभिकर्ता यांचेमार्फत भरणा केला जातो.

०२. लेखा विभागाशी संबंधीत आहे.

०३. जकात विभागातील स्टेशनरी खर्च रू.२,३५,७२०/- (दि.१/३/०७ ते २९/२/०८ पर्यंत) हा जकात संकलन अभिकर्ता यांच्याकडून वसूल करण्यात येतो.

**मुख्य लेखापरिक्षक**

**उत्तर :**

प्रश्न क्र.२५ चे संदर्भाने उत्तर सोबत तक्त्यात जोडले आहे.

**श्री.सुरेंद्रजितसिंग सबरवाल,स.पालिका सदस्य**

**प्रश्न क्र.२६ :**

०१. अ) औरंगाबाद महानगरपालिका मध्ये एकुण किती विभाग आहे? प्रत्येक विभागाचे प्रमुख कोण? ब) प्रत्येक विभागाचे कार्यकारी अभियंता,उपअभियंता,वार्ड अधिकारी,वार्ड अभियंता,अति.शहर अभियंता व मुख्य लेखाधिकारी या सर्वांचे शैक्षणिक,व्यवसायीक प्रमाणपत्राची झेरॉक्स देणे? क) प्रत्येक अधिकारी कोणत्या प्रवर्गात येतात व प्रत्येकांचे जात प्रमाण पत्राची झेरॉक्स देणे? या सर्वाची सविस्तर माहिती देण्यात यावी.

**सहाय्यक आयुक्त-१**

**उत्तर :**

माहे ऑगस्ट २००८ च्या सर्वसाधारण सभेमध्ये विचारलेल्या प्रश्न क्र.२६ मधील (अ) नुसार औरंगाबाद महानगरपालिकेमध्ये एकुण ४९ विभाग असून, यासोबत विभाग प्रमुख,कार्यरत विभाग व त्यांच्या प्रवर्गाची माहितीची यादी यासोबत जोडण्यात येत आहे. तसेच प्रत्येक अधिकाऱ्याची जात प्रमाणपत्राची छायांकीत देण्याबाबतचे काम हे विस्तृत स्वरूपाचे असून, सदरील अधिकाऱ्यांचे वैयक्तिक संचिकेतून माहिती उपलब्ध करून देण्यात येईल.

| अ.क्र | विभागाचे नांव | विभाग प्रमुखाचे नांव,पदनाम | जातीचा संवर्ग | शाखा प्रमुखाचे नांव, पदनाम | जातीचा संवर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | मा.आयुक्त | मा.श्री.दिलीप बंड, आयुक्त | खुला | --- | --- |
| २ | लेखा परिक्षण विभाग | श्री.वि.स.जाधव, मुख्य लेखा परिक्षक | खुला | --- | --- |
| ३ | उप आयुक्त (प्रशासन) | श्री.एम.वाय.कांबळे, उपआयुक्त (प्रशासन) | अ.जा. | श्री.वि.वा.जावरे,प्रकल्प संचालक | अ.जा. |
| ४ | | | | डॉ.नाईकवाडे मुख्य पशुसंवर्धन अधि. | खुला |
| ५ | | | | श्री.जे.एम.भडके,उद्यान अधिक्षक | खुला |
| ६ | | | | सौ.अर्पणा थेटे,विधी सल्लागार | खुला |
| ७ | | | | श्रीमती एल.टी.धेनक,शिक्षणाधिकारी | अ.जा. |
| ८ | | | | श्री.डी.बी.लोखंडे,कामगार अधिकारी | अ.जा. |
| ९ | | | | सौ.ज्ञानदा कुलकर्णी, सांस्कृतिक अधिकारी | खुला |
| १० | | | | सौ.कांचन सप्रे,क्रिडाधिकारी | खुला |
| ११ | | | | सौ.समता वांगे,सहा.ग्रंथपाल | खुला |
| १२ | | | | श्री.गणेश जाधव,प्र.जनसंपर्क अधिकारी | खुला |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १३ | | | | श्री.रावसाहेब मालोदे,प्र.व्यवस्थापक, सिध्दार्थ जलतरण तलाव | खुला |
| १४ | उप आयुक्त (महसुल) | श्री.यु.आर.घुगे उप आयुक्त (महसुल) | भजड | श्री.अय्युब खान नूर खान, सहाय्यक आयुक्त-१ व २ | अ.ज. |
| १५ | | | | श्री.बी.ए.वाहुळ,प्रशासकीय अधिकारी | अ.जा. |
| १६ | | | | श्री.डी.डी.काळेले,मालमत्ता अधिकारी | खुला |
| १७ | | | | श्री.टी.जी.जाधव, जकात अधिक्षक | विजाभज (अ) |
| १८ | | | | श्री.एस.बी.झनझन, मुख्य अग्निशमन अधिकारी | खुला |
| १९ | | | | श्री.आर.एन.राऊत,सुरक्षा अधिकारी | विजाभज |
| २० | नगर सचिव विभाग | श्री.एम.ए.पठाण नगर सचिव | खुला | --- | --- |
| २१ | लेखा विभाग | श्री.संजय पवार प्र.मुख्य लेखाधिकारी | अ.जा. | श्री.एन.जी.दुर्रानी,लेखाधिकारी | खुला |
| २२ | | | | श्री.ए.ई.लाड,भांडार लेखापाल | भजड |
| २३ | आरोग्य विभाग | डॉ.श्रीकृष्ण देवगांवकर, आरोग्य वैद्यकीय अधि. | खुला | --- | --- |
| २४ | नगर रचना विभाग | श्री.एस.एन.भंडारी, प्र.सहा.संचालक | खुला | श्री.व्ही.जी.वझे,उप अभियंता | खुले |
| २५ | | | | श्री.पी.जी.पवार,उपअभियंता | इमाव |
| २६ | कर निर्धारक व संकलक विभाग | श्री.खा.बी.अरब, कर निर्धारक व संकलक | खुला | श्री.व्ही.डी.राठोड प्र.वार्ड अधि-(अ) | विजाभज (अ) |
| २७ | | | | श्री.डी.डी.सुर्यवंशी वार्ड अधि-(ब) | अ.ज. |
| २८ | | | | श्री.डी.ए.गिरी,वाड अधि-(क) | भज (ब) |
| २९ | | | | श्री.रविंद्र निकम,वार्ड अधि-(ड) | अ.ज. |
| ३० | | | | श्री.एस.आर.जरारे,वार्ड अधि(ई) | अ.ज. |
| ३१ | | | | श्री.महावीर पाटणी, प्र.वार्ड अधि-(फ) | खुला |
| ३२ | | | | श्री.शिरीष रामटेके वार्ड अभि-(अ) | अ.जा. |
| ३३ | | | | श्री.फारूख खान वार्ड अभि-(ब) | खुला |
| ३४ | | | | श्री.हेमंत कोल्हे, वार्ड अभि-(क) | इमाव |
| ३५ | | | | श्री.एस.पी.खन्ना, वार्ड अभि-(ड) | खुला |
| ३६ | | | | श्री.एस.एल.पवार वार्ड अभि-(ई) | अ.जा. |
| ३७ | | | | श्री.वसंत निकम वार्ड अभि-(फ) | खुला |
| ३८ | कार्य.अभि. (पा.पु.)विभाग | श्री.डी.पी.कुलकर्णी, कार्यकारी अभियंता | खुला | श्री.एन.पी.गायकवाड प्र.उप अभियंता,पा.पु.-१ विभाग | खुला |
| ३९ | | | | श्री.आर.बी.खाजा, उप अभियंता,पा.पु.२ विभाग | खुला |
| ४० | | | | श्री.यु.जी.शिरसाठ, सहा.अभियंता,जायकवाडी (यांत्रिकी) | इमाव |
| ४१ | अतिरीक्त शहर अभियंता विभाग | श्री.एम.डी.सोनवणे | अ.जा. | श्री.एस.डी.काकडे, उप अभियंता,बांधकाम-१ विभाग | खुला |
| ४२ | | | | श्री.ए.बी.देशमुख, उप अभियंता,बांधकाम-२ विभाग | खुला |
| ४३ | | | | श्री.जी.बी.सोनी, उप अभियंता यांत्रिकी विभाग | खुला |
| ४४ | | | | श्री.एम.बी.काझी, उप अभियंता तथा निवडणूक विभाग प्रमुख | खुला |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४५ | कार्य.अभि.(वि/ड्रे/इ/बां विभाग | श्री.एस.डी.पानझडे, कार्यकारी अभियंता | अ.जा. | श्री.अफसर सिद्यीकी उपअभियंता तथा निवडणूक विभाग प्रमुख | खुला |
| ४६ | | | | श्री.सिकंदर अली, उपअभियंता,स्लम विभाग | खुला |
| ४७ | | | | श्री.शेख खमर,उपअभियंता,ड्रेनेज विभाग | विजाभज |
| ४८ | | | | श्री.पी.आर.बनसोडे,उ.अ.वि.-१ विभाग | |
| ४९ | | | | श्री.आर.एस.बनकर,प्र.उ.अभि.वि.-२ विभाग | अ.जा. |

**श्री.सुरेंद्रजितसिंग सबरवाल,स.पालिका सदस्य**

**प्रश्न क्र.२७ :**

०२. महानगरपालिका औरंगाबाद अंतर्गत जाफर गेट येथील रविवार बाजार विषयी माहिती.

अ) रविवार बाजार जेथे भरविण्यात येतो तो किती क्षेत्रफळामध्ये भरविण्यास परवानगी देण्यात आली?

**उप आयुक्त (सिडको)**

**उत्तर :**

रविवार बाजाराचे उपलब्ध अभिलेखानुसार क्षेत्रफळ ३०२० चौ.मी.साईट नंबर ५४ येथे आठवडी बाजार भरत आहे.

ब) सदरील बाजाराची बाजारपट्टी महानगरपालिकातर्फे किंवा खाजगी तत्वावर वसूल करण्यात येते का? ते सविस्तर माहिती देण्यात यावी?

**उत्तर :**

रविवार बाजाराची फी वसूलीसाठी पाच वेळेस बोली/निविदा जाहीर प्रसिध्दीस स्थानिक वर्तमानपत्रात दिलेली असून त्यास प्रतिसाद मिळत नसल्यामुळे बोली/निविदा अंतिम होवु शकली नाही. सध्या मनपा कर्मचाऱ्यातर्फे सदरील बाजाराची फी वसूली करण्यात येत असून मनपा फंडात जमा करण्यात येत आहे.

क) रविवार बाजार ठरावीक क्षेत्रफळामध्ये भरविण्यात येतो की वाढीव भागात याची सविस्तर माहिती देण्यात यावी?

**उत्तर :**

रविवार बाजार पूर्वीपासून जेथे भरतो तेथेच भरविला जातो.

करीता आपले माहितीस्तव कळविण्यात येत आहे.

**श्री.प्रशांत देसरडा,स.पालिका सदस्य**

**प्रश्न क्र.२८ :**

०१. गेल्या २० वर्षामध्ये स्थानीक नागरीकांचे व शासनाची जमीन,स्माशानभूमी,कब्रस्तान व गार्डनसाठी किंवा रस्त्यासाठी अशा विविध कारणासाठी भूसंपादन केली काय केली असल्यास त्याची तक्तावार माहिती.

| अ. क्र. | जमीन भूसंपादन केल्याची माहिती किंवा प्रकार | भूसंपादन केल्याचे कारण | मनपाकडे रजीस्ट्री हस्तांतर आहे काय | पी.आर.कार्ड म.न.पा.नावे आहे काय | पी.आर.कार्ड नसल्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|

०२. उपरोक्त विविध कारणासाठी भुसंपादन केलेल्या जमीनीच्या रक्कमा त्या-त्या पार्टीच्या नावे भुसंपादन कार्यालय किंवा S.C.O यांच्या कार्यालयात पार्टीच्या नावे जमा आहेत काय असल्यास अशा पार्टीची यादी किंवा प्रलंबीत असल्यास प्रलंबीत अशा प्रकरणांची यादी.

**उत्तर :**

अप्राप्त